मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १६६ ■ बुधवार दि. ०४/०३/२०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## सणसर मंडळ कार्यालयात शिवराज्य महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन



**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील तहसिलदार कार्यालयाच्या वतीने पुढील महिन्यात सणसर मंडळ कार्यालयात दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार शिवराज्य महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येणार आहे.

या शिबिरात परिसरातील शेतकरी व नागरिक यांची महत्त्वाची कामे एकाच ठिकाणी करण्यात येणार आहेत.त्यामध्ये विविध योजनांचे अर्ज स्वीकारणे व निर्णय आदेश देणे फेरफार प्रकरणे निकाली काढणे उत्पन्न व रहिवासी दाखले,जन्म प्रमाणपत्रे वितरीत करणे भोगवटादार वर्गवारीत अकृषक सुधारणा करणे कमी-जास्त पत्रके तयार करणे संग्रहीत कागदपत्रांची पडताळणी करणे पी.एम. किसान योजना व जिवंत सातबारा संबंधित कामे होणार असून सणसर मंडळातील सणसर, जाचकवस्ती सपकळवाडी, हिंगणेवाडी,लाकडी ,निंबोडी,शिंदेवाडी बोरी,भवानीनगर,तावशी व काझड या ग्रामांमध्ये अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांच्या विविध शासकीय कामांचा निपटारा करणार आहेत.

शासनाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन शासकीय कामांसाठी तहसिल कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागणार नाहीत.एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध होणार असल्याने जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## आखाती देशांतील युद्धामुळे जगावर तेल संकट; रशिया पुन्हा एकदा भारताच्या मदतीसाठी सरसावला



नवी दिल्ली - अमेरिका-इस्रायलच्याइराणवरील हल्ल्यानंतर संतापलेल्या इराणने प्रत्युत्तर देत संपूर्ण पश्चिम आशियाई देशांना युद्धात ओढले आहे. इराणने इस्रायलसह सौदी अरेबिया, कुवेत, ओमान, जॉर्डन, यूएई या देशातील अमेरिकन सैन्य तळ आणि इतर महत्त्वाच्या प्रकल्पांना टार्गेट केले आहे. इराण आणि इस्रायल युद्धामुळे जगावर तेल संकट उभे राहिले आहे. त्यातच भारताकडे ५० दिवस पुरेल इतका क्रूड ऑईल आणि रिफाइंड ऑईलचा साठा शिल्लक आहे. अशा परिस्थितीत रशिया पुन्हा एकदा भारताच्या मदतीसाठी पुढे आला आहे.

माहितीनुसार, जर आखाती देशात सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेल पुरवठा खंडीत झाला तर आम्ही भारताला ऊर्जा प्रकल्पात मदत करण्यासाठी तयार आहोत असं रशियाने स्पष्ट केले आहे. पश्चिम आशियात वाढत्या तणावामुळे ऊर्जा मार्केट अस्थिर झाले आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुजच्या माध्यमातून होणारा तेल पुरवठ्याबाबत गंभीर चिंता वाढली आहे. हा एक सागरी मार्ग आहे जो जागतिक तेल आणि गॅस व्यापारात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारताकडे पर्याप्त कच्चे तेल आणि इंधनाचा साठा आहे. त्यामुळे काही दिवस आपण या संघर्षातून उद्भवणाऱ्या स्थितीचा सामना करू शकतो असं भारत सरकारने स्पष्ट केले आहे.

भारतात जवळपास निम्मे कच्चे तेल आणि एलपीजीचे आयात स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून होते. परंतु अमेरिका, इस्रायल यांनी इराणच्या अनेक शहरांवर हल्ले केल्यानंतर इराणनेही पलटवार करत आखाती देशांना टार्गेट केले. त्याशिवाय स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून वाहतूक करणाऱ्या जहाजांनाही धमकी दिली आहे. त्यामुळे सध्या या मार्गावरून सागरी वाहतूक ठप्प झाली आहे. भारताकडे आताच्या घडीला कच्चे तेल आणि रिफाइंड पेट्रोलियन उत्पादनाचा एकूण ५० दिवसांचा साठा शिल्लक आहे, ज्यात २५ दिवसाचे कच्चे तेल आणि २५ दिवसांचे पेट्रोलियम उत्पादनाचा समावेश आहे. पश्चिम आशियात वाढणाऱ्या तणावात केंद्रीय अधिकारी कच्चे तेल, एलपीजी, एलएनजी आयात करण्यासाठी पर्यायी देशांचाही शोध घेत आहेत.

दरम्यान, भारताकडे पेट्रोल, डिझेल आणि अन्य इंधनाची मागणई करण्यासाठी सहा ते आठ आठवड्यापर्यंत पर्याप्त कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादन साठा आहे. सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे होणाऱ्या कोणत्याही अल्पकालीन पुरवठ्यातील संकटाला तोंड देण्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस पुरवठा मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी सांगितले आहे. कच्चे तेल आयात करणारा भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा देश आहे. त्याशिवाय तेल शुद्धिकरण क्षमतेत चौथ्या क्रमांकावर आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीत पाचव्या क्रमांकावर आहे.

## होळीच्या मुहूर्तावर नवी मुंबई पोलिसांकडून 18 कोटी 63 लाख रुपयांचे अमली पदार्थ नष्ट



दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर) :

'नशा मुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवाईचा पुढील टप्पा म्हणून नवी मुंबई पोलिसांनी होळीच्या मुहूर्तावर तब्बल 18 कोटी 63 लाख 34 हजार 266 रुपयांच्या किमतीचे अमली पदार्थ नष्ट केले. हे अमली पदार्थ 55 वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आले होते.

तळोजा येथील शासनमान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीमध्ये कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या अमली पदार्थांचा नाश करण्यात आला. मागील तीन वर्षांत बेकायदेशीररीत्या वास्तव्य करून ड्रग्ज विक्री करणाऱ्या आफ्रिकन नागरिकांविरोधात विशेष मोहीम राबवण्यात आली. या कारवाईत 1522 जणांना हद्दपार करण्यात आले असून 111 जणांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे. तसेच अमली पदार्थ विक्रीत सक्रिय सहभाग आढळलेल्या आरोपींविरुद्ध मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, पंजाब राज्यातून नवी मुंबईत येऊन हॉटेल, लॉज व पीजीमध्ये राहून ट्रक आणि रेल्वेमार्गे अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्या टोळीचाही पर्दाफाश करण्यात आला आहे. या प्रकरणात 16 गुन्हे दाखल करून 33 आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींकडून 4 कोटी 20 लाख 70 हजार रुपयांच्या किमतीचे हेरॉईन, अफू, मेफेड्रोन आणि कोडीनच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून मुख्य सूत्रधाराला पंजाब राज्यातून अटक करण्यात आली आहे.

## ज्येष्ठ नागरिकांची रंगपंचमी उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :**

विक्रोळीत कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाच्या हरि ओम कट्ट्यावर प्रभात समयी ज्येष्ठ नागरिकांनी रंगपंचमी उत्सव रंगांची उधळण करून उत्साहात साजरा केला.ज्येष्ठ नागरिकांनी एकमेकांना रंग लावून आपला आनंद द्विगुणित केला.गाण्यांवर ताल धरुन ज्येष्ठ नागरिक बेफामपणे नाचले. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,खजिनदार गौतम नि.डांगळे,माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत, माजी अध्यक्ष व ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर आदींसह मंडळाचे ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## संकटमोचन हनुमान मंदिर प्रभाग क्रमांक ८ महागाव येथे होळी दहन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे**
**महागाव ( यवतमाळ)**

महागाव शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील संकटमोचन हनुमान मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी दहनाचा कार्यक्रम अत्यंत भक्तीभावाने, आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. या उपक्रमात प्रभागातील सर्व नागरिकांनी आणि हनुमान भक्तांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन सहभाग नोंदवला. सण आणि धार्मिक उत्सवांमुळे समाजात सामाजिक एकता आणि मांगल्याची भावना दृढ होते, याची प्रचिती या सोहळ्यात आली.

कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये:

सामूहिक पूजन: होळी दहनापूर्वी संकटमोचन हनुमान मंदिरात विशेष आरती आणि पूजन करण्यात आले. भाविकांनी पारंपरिक पद्धतीने नैवेद्य अर्पण करून सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

भक्तीमय वातावरण: "बजरंग बली की जय" च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ढोल-ताशांच्या गजरात तरुणाईने जल्लोष केला.

प्रदूषणमुक्त होळीचा संदेश: आयोजकांतर्फे लाकडांचा कमीत कमी वापर करून आणि रसायनांचा त्याग करून पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.

एकतेचे दर्शन: प्रभागातील लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच स्तरातील नागरिकांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले, ज्यामुळे प्रभागात सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले.

या मंगलमयी सोहळ्यानंतर आता नागरिकांमध्ये धुलीवंदन आणि रंगपंचमीचा मोठा उत्साह दिसून आला. ओम कुसंगवार,

सॅम कदम गजानन नरवाडे रवी कदम, प्रवीण नरवाडे सचिन भरवाडे ,सोनू इंगोले ,गणेश घोडे ,सुनील कदम ,विष्णू जाधव, महेश अण्णा ,पांडू नरवाडे, श्रीकांत नागमोते गौरव गायकवाड, बाळासाहेब वाकोडे,ऋषिकेश वाकोडे ओंकार बेलखेडे आदी उपस्थित होते.

## "दुर्गंधीने श्वास घुसमटतोय; प्रशासन मात्र निष्क्रिय!"

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले**
**लाखनी भंडारा**

खुटसावरी (ता./जि. भंडारा) – ग्रामपंचायत वॉर्ड क्र. 3 मध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असून गटारात सांडपाणी अडकून सडत आहे. नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने पाणी तुंबून राहिले आहे. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांची उत्पत्ती वाढली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. गटारात साचलेले सांडपाणी काळपट झाले असून त्यातून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांनी ग्रामपंचायतीने तातडीने गटारांची स्वच्छता करून औषध फवारणी करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आरोग्य विभागाने हस्तक्षेप करून जबाबदारांवर कारवाई करावी, असा इशाराही देण्यात आला आहे. "स्वच्छता हीच सेवा" या घोषणेचा केवळ फलकावरच उल्लेख न राहता प्रत्यक्ष कृती व्हावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.



## 18,92,500/- रु. किंमतीच्या अंमली पदार्थ (हेरॉईन) विक्री करणाऱ्या महिलेला पोलीसांनी मुद्देमालासह केले अटक




दैनिक युवक आधार

पनवेल, वार्ताहर सानपाडा पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाने 18,92,500/- रु. किंमतीच्या अंमली पदार्थ (हेरॉईन) विक्री करणाऱ्या महिलेला पोलीसांनी मुद्देमालासह अटक केली आहे.

सानपाडा पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि संजय धारेराव, पोहवा संतोष बडे, सुनिल चव्हाण, राहुल सुर्यवंशी, संदीप पवार, पोशि गणेशकुमार करवर हे हद्दीत गस्त करत असताना सानपाडा रेल्वे स्टेशन समोरील बस डेपोच्या गेट जवळ एक महिला संशयास्पद हालचाली करीत असताना दिसुन आली. पोलीस पथकाने तिच्याकडे अधिक चौकशी केली असता तिचे नाव फातिमा अल्लाउद्दीन शेख वय 39 वडाळा, मुंबई असे असुन तिच्या हातातील पर्समध्ये अंमली पदार्थ सदृश्य वस्तु मिळुन आली. रात्रीची वेळ असल्याने तसेच महिला असल्याने तिच्याकडे चौकशी व तिची झडती घेणेकामी राजपत्रित अधिकारी म्हणुन वपोनि देवीदास कठाळे व महिला पोलीस अधिकारी मसपोनि सविता कटके यांनी समक्ष उपस्थित राहुन दोन पंचांच्या समक्ष तिची झडती घेतली असता, तिच्या ताब्यातुन 37.85 ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ मिळुन आला. सदर अंमली पदार्थ याची फॉरेन्सिक व्हॅनवरील तज्ञांनी तपासणी करुन तो हेरॉईन असल्याचा अहवाल दिला आहे.

सदर कारवाईदरम्यान संपुर्ण कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आरोपीत महिलेच्या विरोधात सानपाडा पोलीस ठाणे येथे एनडीपीएस कायदा कलम 8(ल), 21(ल) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीत महिलेच्या ताब्यातुन 37.65 ग्रॅम इतक्या वजनाचे 18,92,500/- रु. किं.चे हेरॉईन, 2,730/- रु. रोख रक्कम व एक मोबाईल फोन असा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

सदरची कारवाई ही पंकज डहाणे, पोउपआ सो, परिमंडळ 1, वाशी, आदिनाथ बुधवंत, सहाय्यक पोलीस आयुक्त, वाशी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सानपाडा पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास कठाळे, मसपोनि सविता कटके, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि संजय धारेराव, पोहवा संतोष बडे, सुनिल चव्हाण, राहुल सुर्यवंशी, संदीप पवार, पोशि गणेशकुमार करवर, मपोशि मालुंजकर यांनी केलेली आहे.

## विठ्ठल रखुमाई च्या चरणी रामदास वाढवणे यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**



दि.४,ठाणे- जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा मानपाडा टेम्पो ओनर्स असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष, ठाणे जिल्हा ट्रक टेम्पो टॅंकर्स बस वाहतूक संघाचे उपाध्यक्ष, पोलिस आयुक्त क्षेत्र शांतता समितीचे सदस्य, सेनापती बापट को.ऑ. क्रे. सोसा. चे संचालक व शिव स्वामी फाउन्डेशन ट्रस्ट चे राज्य उपाध्यक्ष रामदास वाढवणे यांचा वाढदिवस नुकताच १ मार्च रोजी विठ्ठल रखुमाई मंदिर व टेम्पो असोसिएशन च्या पटांगणात उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी जन्मदिवसाचे औचित्य साधून मानपाडा टेम्पो ओनर्स असोसिएशन व अथायू युरो केअर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने १ मार्च २०२६ रोजी मानपाडा टेम्पो नाका येथे मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले. शेकडो नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेतला.

वडवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राहुल मस्के, चितळसर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक सुनिल वरुडे , वृत्तपत्र विचार विमर्श व मानव हक्क व माहिती अधिकार जनजागृती करणाऱ्या शिव स्वामी फाउन्डेशन चे पदाधिकारी विलास सावंत, नरेंद्र पाटील, राजकुमार शर्मा इत्यादी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून वाढवणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. सुनील पाटील व डॉ.परेश पानमंद यांचे आरोग्य शिबीराला मार्गदर्शन लाभले . हा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी असोसिएशनचे उपाध्यक्ष बबन जाधव, सल्लागार सुनील गायकवाड, सेक्रेटरी प्रदिप बनकर, खजिनदार सतीश शिंदे इत्यादींनी परिश्रम घेतले.

# संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल, शिराळा येथे संस्कृती संगम 2026 वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**दैनिक युवक आधार**
**/केज प्रतिनिधी**

शिराळा : संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल, शिराळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण व सांस्कृतिक वातावरणात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. राजेंद्र ब्रीजलाल बाहेती यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. वैभव माने उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी श्री. जितेंद्र रामराव मुटकुळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य मा. श्रीकांत माने, सौ. दिपाली आदमाने, जयचंद भिसे (माजी चेअरमन), संचालक मंडळातून शरद गिराम सर, साईनाथ गावडे सर, अजय चाटे सर, उद्धव जाधव (पालक प्रतिनिधी), ज्ञानेश्वर काळे (राज्य संघटक - रयतेचे स्वराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), इरफान सय्यद यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुंदर प्रभावी प्रास्ताविक देशमुख मॅडम यांनी करून आकर्षक व प्रभावी सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी करून उपस्थितांची मन जिंकली.



कार्यक्रमाची सुरुवात समाजसुधारकांना अभिवादन करून तसेच स्वागत गीताने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. “गणपती वंदना” तसेच देशभक्तीपर गीतांमुळे वातावरण राष्ट्रप्रेमाने भारावून गेले. “मेरा भारत, प्यारा भारत” व “कंदो से कंदे मिलते है” या सादरीकरणांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

“चला कोकण पाहू” या गीतातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविण्यात आले, तर “फॅमिली थीम” व “दमलेल्या बाबाची कहाणी” या सादरीकरणांनी कुटुंबातील नातेसंबंधांची जाणीव प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली. “या धरणी आईला” या नृत्यनाटिकेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच “शिव तांडव” शालेय विद्यार्थ्यांनी या प्रभावी नृत्य सादरीकरणाने उपस्थितांची विशेष दाद मिळवली व कार्यक्रमात अध्यात्मिक ऊर्जेची भर घातली.

उद्घाटक डॉ. राजेंद्र ब्रीजलाल बाहेती यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी आरोग्य, शिस्त व परिश्रम यांना जीवनात प्राधान्य द्यावे, असे मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. वैभव माने यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत शिक्षणासोबत कला व आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी “मल्हार वारी मोती आण द्यावी भरून” हे भावपूर्ण गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

मुख्याध्यापक श्री. देशमुख सर यांनीही आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले. या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार करणारी शाळा आहे हे सिद्ध करून दाखवले. या यशस्वी कार्यक्रमासाठी नाजमीन काजी (उप- मुख्याध्यापिका), दत्ता साळुंके, राजकन्या साळुंके, नानासाहेब कटाळे, अर्जुन नाडे, दिव्यता खोसे, राधा मोरे, श्रीदेवी पानढवळे, प्रियंका नानजकर, अपेक्षा भुजबळ, भाग्यश्री आतकरे वरील सर्व शिक्षक, पालक विद्यार्थी, वाहनचालक व मित्रपरिवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पालक, ग्रामस्थ व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेला हा कार्यक्रम देशमुख सर यांच्या कटिबद्ध नियोजनाने व शालेय व्यवस्थापन, मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांच्या परिश्रमामुळे व सर्व उपस्थित पालकांच्या सहकार्यामुळे यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# स्व.वामनराव देशमुखांना विद्यार्थ्यांतून आदरांजली..

## पुण्यतिथीनिमित्त आलापुरे शाळेत शैक्षणिक साहित्य वितरण

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -**
**राजु शिंदे**

:राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधत तसेच स्व. वामनराव देशमुख बाजीराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त लोकमान्य सार्वजनिक वाचनालय, भोकरदन यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,आलापुर येथे विद्यार्थ्यांना रजिस्टर,पेन व केळीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवणे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप मिरकर,गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे विषय साधन व्यक्ती व लोकमान्य वाचनालयाचे कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर देशमुख,मुख्याध्यापक भगवान देठे, संतोष सोनवणे, बाळू शिंदे,संजय जाधव,विश्वनाथ सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक भगवान देठे यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत शाळेत करण्यात आलेल्या भौतिक शैक्षणिक बदलांची माहिती दिली.सामाजिक अंकेक्षणासाठी उपस्थित जिल्हा समन्वयक कैलास कोळेकर, ग्रामसाधन व्यक्ती सी.सी. सूर्यवंशी व एम.सी. काळे यांनी शाळेतील गुणवत्तावाढ व भौतिक सुधारणांबाबत समाधान व्यक्त केले.कार्यक्रमास अंगणवाडी सेविका संगीता इंगळे, कार्यकर्ती फिजा शाह, स्वयंपाकी मदतनीस पर्वताबाई गायकवाड, तालेमुनबी शाह तसेच महिला पालक लक्ष्मीबाई गायकवाड, सुनिताताई गायकवाड, निर्मलाताई गोरे, प्रयागताई मिरकर, आशाताई जाधव, छायाताई गायकवाड, नाजीया शाह, मंदाताई मिरकर व श्री सुधाकर आप्पा गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक भगवान देठे यांनी केले तर आभारप्रदर्शन सुरेश माळेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राथमिक पदवीधर प्रसाद रिंढे तसेच सहशिक्षक गजानन लोखंडे व रामचंद्र भालेराव यांनी परिश्रम घेतले.

## पहेला येथील माजी जि.प.सदस्या यामिनीताई सुरेश बांडेबुचे युरोप दौऱ्यावरून शेतकरी अभ्यास करून परतल्यावर पत्रकार संजीव भांबोरे यांनी त्यांच्या स्वगृही दिली सदिच्छा भेट

दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे

भंडारा -तालुक्यातील पहेला येथील माजी जिल्हा परिषद सदस्या यामिनीताई सुरेश बांडेबुचे यांची आज दिनांक 3 मार्च 2026 ला पत्रकार संजीव भांबोरे यांनी त्यांच्या घरी सदिच्छा भेट घेऊन युरोप दौऱ्यावरून शेतकरी अभ्यास करून स्वगृही परत आल्यावर त्यांना युरोप दौऱ्यात जे अनुभव आले याबाबत भेट घेतल्यानंतर विविध प्रश्नावर चर्चा केली. विदेश दौऱ्यात त्यांनी फ्रान्स , स्विझर्लंड,नेदरलँड, जर्मनी, या देशांना भेटी दिल्यानंतर कोणता अनुभव आला अशा प्रकारे प्रश्न उपस्थित केला असता त्यांनी आम्ही 19 फेब्रुवारीला शिवजयंती असताना महाराष्ट्राची संस्कृती

### विदेश दौऱ्यात त्यांनी फ्रान्स, स्विझर्लंड, नेदरलँड ,जर्मनी या देशांना भेटी दिल्या

व इतिहासाची परंपरा कायम ठेवून शिवजयंती साजरी केली . प्रमाणे फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे अत्याधुनिक बकरी व गायीच्या दूध प्रकल्पाला भेट दिली. फ्रान्समध्ये द्राक्ष प्रक्रिया व सेंद्रिय शेती यांना भेट दिली. बायोगॅस व दुग्ध डेअरी यांनाही भेट दिली. नेदरलँड मधील फुलबागांच्या व्यवसायाबद्दल त्यांनी माहिती दिली .त्याचप्रमाणे फ्रान्समधील आयफेळ टॉवर्स याबाबत पत्रकारांना माहिती दिली व आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीमुळे उत्पादनात वाढ होऊन शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम कसं होईल याबाबत माहिती दिली. यावेळी सनराईज कम्प्युटरचे संचालक विलास बांडेबुचे,सामाजिक कार्यकर्ते कुलदीप गंधे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# विठाबाई दगडू पाटील यांचे आकस्मिक निधन


दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी :

दैनिक युवक आधारचे पत्रकार मच्छिंद्र पाटील यांच्या मातोश्री विठाबाई दगडू पाटील यांचे सोमवार दिनांक २ मार्च २०२६ रोजी वयाच्या ८०व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटील कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून पनवेल परिसरात शोककळा पसरली आहे.

विठाबाई पाटील या अत्यंत प्रेमळ, कर्तृत्ववान आणि मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांनी आयुष्यभर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पार पाडत समाजात आपुलकीची नाळ जपली. त्यांच्या सहवासाने अनेकांना मायेची ऊब आणि मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. नातेवाईक, मित्रपरिवार तसेच पत्रकार बांधवांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच सर्वांकडून भावपूर्ण श्रद्धांजली.



# सातबारावर हात साफ... नदीवर डल्ला... आता तर अनुदानावर घाला?

## भोकरदनमध्ये अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याची दुर्गंधी; चौकशीपासून तालुका दूरच का?

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक महाराष्ट्र -**
**राजु शिंदे :** जालना जिल्ह्यात 2022 ते 2024 या काळातील अतिवृष्टी व गारपीट अनुदान घोटाळ्याची चौकशी सुरू असताना अंबड व घनसांवगी वगळता भोकरदनसह इतर तालुक्यांना मुद्दाम वगळण्यात आल्याने संशयाचा भोवरा निर्माण झाला आहे.भोकरदनमध्येच घोटाळा मोठा असल्याने चौकशी टाळली जात आहे का?” असा थेट सवाल उपस्थित होत आहे. तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेले अनुदान आजवर मिळालेले नाही. गेल्या तीन-चार वर्षांपासून शेतकरी तहसील कार्यालयाच्या पायऱ्या झिजवत आहेत.

“यादी अपलोड केली आहे, पैसे खात्यात येतील,” असे सांगून शेतकऱ्यांची बोळवण सुरू आहे.

मात्र प्रत्यक्षात एक रुपयाही खात्यात जमा झालेला नाही. दरम्यान,चौकशीची शक्यता निर्माण होताच काही निवडक शेतकऱ्यांच्या खात्यात अचानक पैसे जमा होऊ लागल्याने

‘घोटाळा झाकण्यासाठीच ही धडपड सुरू आहे का?’असा संशय व्यक्त होत आहे. कार्यालयात बसून फाईली पाहून नव्हे, तर प्रत्येक गावात जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली,तर

भोकरदनमधील घोटाळा अंबड-घनसांवगीपेक्षाही मोठा असल्याचे उघड होईल,असा दावा शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी भोकरदन तालुक्यातील प्रत्येक गावात स्वतंत्र चौकशी करावी,वंचित शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ अनुदान जमा करावे तसेच सातबारावर हात साफ करणाऱ्या नदीवर डल्ला मारणाऱ्याना मदत करणाऱ्या भोकरदन च्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी,अशी जोरदार मागणी होत आहे.

### दोषींवर कडक कारवाई करा

**भोकरदन तालुक्यात अतिवृष्टी अनुदानात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे.अनेक वेळा तक्रारी करूनही एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झाली नाही.चौकशी पथक थातूरमातूर तपास करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत आहे. तसे न करता गावोगावी चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करा व शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ अनुदान जमा करा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.- *नारायण लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते***

### अधिकारी तुपाशी, शेतकरी उपाशी

**भोकरदन तालुक्यात सर्वच योजनांमध्ये भ्रष्टाचार बोकाळला आहे.शेतकऱ्यांना तीन-चार वर्षांपासून अतिवृष्टी व गारपीट अनुदान मिळालेले नाही. योजना कागदावर चालतात,प्रत्यक्षात शेतकरी उपाशी आहे.अन्यायी प्रशासनाविरोधात सर्वांनी एकत्र येऊन मोठा लढा उभारण्याची गरज आहे.- *कडुबा बोरसे, जिल्हा उपाध्यक्ष, आप***

# "WeRmore कंपनीचा दिमाखदार "भव्य वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**

WeR-more कंपनीचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नुकताच सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे ढोल ताशांच्या गजरात, मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या वेळी कार्यक्रमास सर्वसामान्य गृहिणीतून उद्योजिका बनलेल्या अशा साधारण 5000 महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमास मराठी सिने अभिनेते संतोष जुवेकर आणि महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम अभिनेत्री वनिता खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी कंपनीच्या उत्कृष्ट कामगिरीची प्रशंसा करत शुभेच्छा दिल्या.



खांदा कॉलनीत होळीच्या शुभेच्छा देताना माजी उपमहापौर सिताताई पाटील व माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील( दैनिक युवक आधार )

कंपनीचे सर्वेसर्वा सी. एम. डी. विकास गोपाळ सर आणि एम.डी. प्रिया कड मॅडम यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास एक करोड रुपयेच्या वस्तू (ज्यामध्ये 1 ब्रॅन्ड न्यू कार, 5 आयफोन, 25 स्कूटी , 50 स्मार्ट टि व्ही, 50 वॉशिग मशिन , 50 फ्रिज, 50 ज्युसर, 100 गॅस शेगडी 100 स्टील डिनर सेट, 100 मोबाइल फोन, 100 Surprise gift) या सर्व गृहोपयोगी वस्तू लकी ड्रॉ च्या माध्यमातून देण्यात आल्या. त्या प्रसंगी वनिता खरात यांनी सांगितले की,

*जेव्हा एखादी स्त्री उभी राहते तेव्हा एक कुटुंब उभे रहाते.* तसेच मराठी सिने अभिनेते संतोष जुवेकर यांनी महिलांशी संवाद साधतांना सांगितले की, *"WeRmore मधून मिळणारी ऊर्जा सकारात्मक एनर्जी आहे "*

महिलांच्या आरोग्यासाठी आणि रोजगारासाठी काम करणारी कंपनी म्हणजे WeRmore.

ही कंपनी एक परिवार असून महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण होण्याचा प्रभावी प्लॅटफॉर्म आहे. आज पर्यंत अनेक महिला यातून रोजगार मिळवत आहेत. महिला सबलीकरणासाठी संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्रच्या बाहेर सुद्धा या कंपनीने प्रो विंग्ज या सॅनिटरी नॅपकिन च्या माध्यमातून लाखो महिलांना जोडून एक आगळा वेगळा परिवार उभा केला आहे. याच कंपनी मधील आणि ओझर नाशिक येथे राहणारे/ स्थायिक/ वास्तव्यास असलेल्या *वैशाली गोपाल भगत यांनी कंपनीच्या एमरॉल्ड डायरेक्टर पदाचा बहुमान मिळविला.* वैशाली भगत यांनी असंख्य महिलांना एकत्रित करून, कंपनीची माहिती देत त्यांना रोजगार प्राप्त करून दिला आणि यातूनच त्यांनी त्यांची स्वप्न देखील पूर्ण केली. याच माध्यमातून त्यांनी स्वतःच्या हिमतीवर प्रीमियम लक्झरीयेस स्कोडा कार घेऊन परिवाराचे स्वप्न देखील पूर्ण केले.

त्याचेच काही क्षणचित्र खास आपल्या करिता. (फोटो/ व्हिडिओ डिस्प्ले करणे)

WeRmore मध्ये काम करणे म्हणजे स्वप्नपूर्ती करणे. ही कंपनी बिजनेस साठी नाही तर एक कुटुंब बनून मोठा परिवार तयार झाला आहे. घरातील स्त्री सक्षम असेल तर घर परिपूर्ण होते यासाठी हा तयार करण्यात आलेला प्लॅटफॉर्म हा समाजासाठी एक आदर्श आहे.

प्रसंगी राजनंदनी आंद्रे आणि मानसी पत्त्याने यांनी करोडपती होण्याचा बहुमान मिळविला. याप्रसंगी हजारो महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.

इतर राज्यातून आलेल्या माता भगिनींसाठी कंपनी कडून उत्तम व्यवस्था केल्याचे सांगण्यात आले. महिला सबलीकरणाच्या दिशेने WeRmore कंपनीचे कार्य उल्लेखनीय असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा हा एक प्रभावी प्रयत्न असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी गुरुदेव विनोद सुवर्णा, अभिनेत्री वनिता खरात, अभिनेता संतोष जुवेकर, डॉ. धनंजय पाटील, चंद्रकांत पाटील, संदीप भालेकर, कंपनीचे चेअरमन विकास गोपाळ, मॅनेजिंग डायरेक्टर प्रिया कड, दिनेश शिंदे, संजय लाड, निवेदक किरण खोत यांचे सह महाराष्ट्रातून सुमारे 5000 पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

# दैनिक युवक आधारच्या संपादकीय टीमने नैसर्गिक रंगांनी साजरी केली होळी






**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दैनिक युवक आधारच्या संपादकीय टीमने यंदाची होळी व धुलीवंदन नैसर्गिक रंगांचा वापर करून उत्साहात आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी केली. रासायनिक रंगांना दूर ठेवत फुलांपासून व इतर नैसर्गिक घटकांपासून तयार केलेल्या रंगांनी आनंद साजरा करण्यात आला.

या आनंदोत्सवात दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले, महाराष्ट्र संपादक अजय कापरे, दिलीप कोकाटे, दिलीप खुल्लम, उद्योजक संतोष पांडे, उद्योजक सुधीर कटेकर तसेच राजकीय क्षेत्रातील बबन बारगजे यांची उपस्थिती लाभली. सर्वांनी एकमेकांना नैसर्गिक रंग लावत होळीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी "पर्यावरण आणि आरोग्य जपा" हा संदेश देण्यात आला. पाण्याचा अपव्यय टाळून कोरड्या रंगांनी धुलीवंदन साजरे करण्यात आले. मैत्री, एकोपा आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा केलेला हा उत्सव सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

## लोकमत सखी मध्ये स्मिता कवडे रनर अप ; अभिनेत्री मधुरा देशपांडे व मांगल्ये यांच्या हस्ते सन्मानित




दैनिक युवक आधार
मुंबई / प्रतिनिधी

: लोकमत सखी आयोजित बी एन वैद्य संभागृह येथे झालेल्या फॅशन शो मध्ये स्मिता कवडे या रेट्रो थीम मध्ये ज्यात त्यानी जैत रे जैत मधील स्मिता पाटील ची भूमिका केली त्या मध्ये त्या सेमी फायनलीस्ट झाल्या तर कोरम मॉल मध्ये दिनांक २८/२/२६ रोजी झालेल्या फॅशन शो होळी थीम मध्ये त्या रनर अप म्हणून विजेत्या झाल्या.१ मार्च रोजी अभिनेत्री मधुरा देशपांडे ( शुभ मंगलम सावधान फेम ) व अभिनेत्री मांगल्ये ( आप्पी आमची कलेक्टर ) यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. स्मिता कवडे यांची

सामाजिक ,शैक्षणिक,सांस्कृतिक क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत. त्या गेली १५ वर्ष कार्यरत असलेल्या सिध्दी महिला कल्याणकारी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा आहेत. या संस्थेच्या माध्यमातून त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,सावित्रीबाई फुले जयंती,महापुरुषांच्या जयंत्या,महिला सक्षमीकरण व शिक्षण,अंधश्रद्धा निर्मुलन,तृतीय पंथींना रोजगार व शिक्षण, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फॅशन शो,अंधश्रद्धा निर्मूलन,संविधान प्रचार व प्रसार आदि कार्यक्रम राबवित असतात.त्यांनी नाट्य कलावंत म्हणून आपली आवड जोपासली आहे.१०० महिलांचे नेतृत्व करणाऱ्या लोकमत सखीच्या कवडे प्रतिनिधी आहेत.मुंबई व ठाण्यात कार्यरत असलेल्या दिशा वेल्फेअर ग्रुप तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला तालुका या संस्थांवर त्या सदस्य म्हणून काम पाहत आहेत. मुंबई सिटीझन फोरम टी वॉर्ड च्या प्रतिनिधी आहेत.त्यांच्या यशाने त्यांचे सर्वच थरातून कौतुक होत आहे.

## नागपूर पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी हरवलेले १८ मोबाईल नागरिकांना परत

दैनिक युवक आधार
ज्योत्सना करवाडे
विदर्भ संपादिका

नागपूर : होळी व धुलिवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर होळी सणाच्या आधी, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ क्र. ४ च्या वतीने हरवलेले मोबाईल शोधून नागरिकांना परत देण्याचा उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आला. या मोहिमेत एकूण १८ मोबाईल फोन नागरिकांना परत करण्यात आले असून त्यांची अंदाजे किंमत सुमारे १२ लाख ३० हजार रुपये इतकी आहे.



पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ४ रश्मिता राव (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेल व संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे हरवलेले मोबाईल शोधून काढले. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, तेलंगणा, मध्यप्रदेश आदी राज्यांमधून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले.

हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी नागपूर पोलिसांचे आभार व्यक्त केले. मोबाईल हरवल्यास नागरिकांनी त्वरित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून केंद्र शासनाच्या CEIR पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम सायबर सेलचे अधिकारी माननीय पोलीस उपायुक्त रश्मीता राव यांचे मार्गदर्शनात सपोआ चक्करदारा विभाग श्री प्रदीप शिरसकर, सपोआ अजनी विभाग श्री नरेंद्र हिवरे, सपोआ तसेच संबंधित प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे नंदनवन श्री कैलाश दशमाने, चक्करदारा श्री प्रमोद पोरे, इमामवाडा श्री जयवंत पाटील, बेलतरोडी डी श्री मुकुंद कवाडे, हुडकेश्वर श्री हृदयनाथ यादव, यांचे सहयोगाने पार पाडण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक शिंदे सर यांनी केले. व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री प्रशांत साबळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर उपक्रमात पथकाने विशेष परिश्रम घेतले.

## पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर तांत्रिकऐवजी गैर तांत्रिक कामाचा अतिरिक्त ताण; 2 मार्च पासून राज्यभर आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

महाराष्ट्र पशुवैद्यक राजपत्रित अधिकारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनिल गडाख, सरचिटणीस डॉ. किरण देवकाते, डॉ. संदिप शिंदे, डॉ रणजीत शेजुळ, प्रदीप आघाव, महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यकीय संघटनेनं सरकारला इशारा देणारे निवेदन दिलंय. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर तांत्रिकऐवजी गैर तांत्रिक कामाचा अतिरिक्त ताण

बीड - राज्यातील पशुसंवर्धन विभागातील तांत्रिक अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रीय तांत्रिक कामे करण्यासाठी आवश्यक वेळ न देता त्यांना गैरतांत्रिक कामात गुंतवून ठेवले जाते. त्याचा परिणाम राज्यातील पशुवैद्यकीय सेवेवर होत असून, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कार्यक्षमता कमी असल्याचे दाखवून तुच्छतेची वागणूक दिली जातेय. या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी उद्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर आंदोलने करण्याचा निर्णय घेतलाय. महाराष्ट्र पशुवैद्यक राजपत्रित अधिकारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनिल गडाख आणि सरचिटणीस डॉ. किरण देवकाते, महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यकीय संघटना यांनी याबाबत राज्य सरकारला इशारा देणारे निवेदन सादर केलंय.

धोरणाविरुद्ध राज्यभर टप्प्याटप्प्याने आंदोलने : महाराष्ट्र राज्यातील पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये राज्य सरकारच्या वेगवेगळ्या निर्णयामुळे तीव्र नाराजी निर्माण झाली असून, महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने प्रशासनाच्या अन्यायकारक धोरणाविरुद्ध राज्यभर टप्प्याटप्प्याने आंदोलने करण्याची घोषणा केलीय. याबाबत पशुसंवर्धन विभागातील राजपत्रित अधिकारी संघटनेने म्हटले आहे की, पशुसंवर्धन विभागातील तांत्रिक अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी द्याव्या लागतात. पशु आरोग्यसेवा, उपचार, मार्गदर्शन, शिबिरे, लसीकरण, रोग नियंत्रण करण्यासाठी आवश्यक वेळ आणि संधी दिली जात नाही. त्याऐवजी त्यांच्याकडून वारंवार विविध ऑनलाइन नोंदी 'एनडीएलएम' पोर्टलवरील डेटा नोंद अहवाल आणि कागदपत्रांची पूर्तता यांसारखी पूर्णपणे लिपिक वर्गीयाची डेटा एन्ट्री स्वरूपाची कामे करून घेतली जाताहेत, त्याचा परिणाम पशुवैद्यक विभागाच्या योजनांच्या अंमलबजावणीवर होतोय.

प्रशासनाची वागणूक अन्यायकारक : या परिस्थितीत काम कमी केले, कार्यक्षमता कमी झाली, अशा कारणावरून संबंधित अधिकाऱ्यांना तुच्छतापूर्ण वागणूक देण्यात येत असल्याचा आरोप संघटनेने केलाय. राज्य सरकारची ही वागणूक अन्यायकारक आणि मनोबल खच्ची करणारी आहे, असे संघटनेने म्हटले आहे. वास्तविक पाहता तांत्रिक काम करण्यासाठी आवश्यक वेळ प्रशासनाकडून उपलब्ध करून दिला जात नाही आणि उलट गैरतांत्रिक कामांचा अतिरेक करून घेतला जातो. त्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे योग्य नसल्याची बाब संघटनेने निदर्शनास आणून दिलीय.

संघटनेचे आक्षेप : संघटनेने राज्य सरकारला दिलेल्या निवेदनानुसार, पशुसंवर्धन विभागाच्या तांत्रिक अधिकाऱ्यांकडून केवळ तांत्रिक स्वरूपाचे कामे करून घेण्यात यावीत आणि अनावश्यक ऑनलाइन लिपिकीय कामाचा भार कमी करण्यात यावा, अशी मागणी केलीय. त्याचबरोबर अधिकाऱ्यांशी सन्मानपूर्वक न्याय्य वर्तणूक ठेवण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आलीय. याशिवाय प्रशासनावर संघटनेने अनेक आक्षेप घेतलेत. त्यात प्रामुख्याने अत्यल्प मनुष्यबळावर अनेक गावांचा कारभार, रात्री-अपरात्री तात्काळ सेवा देण्याची अपेक्षा, वैयक्तिक मोबाईलवर शासकीय कामांचा ताण, सतत ऑनलाईन अहवाल आणि अपडेट, विनाकारण दवाखान्याच्या वेळामध्ये बदल, जिओ फेस बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची, अधिकारी 24 तास उपलब्ध असावेत, अशी अवाजवी अपेक्षा, 'एफएमडी', 'एसओपी' नुसार काम करून घेणे खात्याची पुनर्रचना होऊनदेखील प्रशासकीय बाबीची आणि मूलभूत सुविधांची वाणवा, तांत्रिक अधिकाऱ्यांना अतांत्रिक कामे करण्यास प्रवृत्त करणे अशा आक्षेपांचा समावेश आहे.

पशुवैद्यकीय दवाखान्याची वेळ अडचणीची : राज्य सरकारच्या नवीन आदेशानुसार पशुवैद्यकीय दवाखान्याची वेळ सकाळी आठ ते दुपारी दीड आणि दुपारी तीन ते सायंकाळी पाच अशी करण्यात आली असून, त्याचबरोबर गावभेटी, ग्रामसभा उपस्थिती, प्रशिक्षण, साप्ताहिक अहवाल आणि 24 तास आपत्कालीन सेवा देण्याची जबाबदारी ही सोपवण्यात आलीय. या सर्व अधिकाऱ्यांसाठी बायोमेट्रिक ऑनलाइन उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आलीय. संघटनेच्या मते कमी मनुष्यबळात या सक्तीच्या अटी लादण्यात आल्यामुळे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर दररोज 12 ते 16 तास जास्तीच्या कामाचा अतिरिक्त ताण येत असल्यामुळे हे अधिकारी मानसिक तणावाखाली आले आहेत. या निर्णयाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यात आपत्कालीन उपचार उशिरा मिळणे, लसीकरण मोहिमा बाधित होणे, कृत्रिम वेतन व गर्भ तपासणी कमी होणे, दूध उत्पादनात घट, रोग नियंत्रणात विलंब, पशुधन मृत्यू वाढण्याची शक्यता, गर्भ तपासणी आणि शस्त्रक्रियांमध्ये घट आधी बाबींचा समावेश आहे.

आंदोलनाचे टप्पे : या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने शासनाच्या व्हॉट्सअपमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. वैयक्तिक मोबाईल आणि इंटरनेटचा वापर शासकीय कामासाठी करण्याचे बंद केलंय. बुधवारी राज्यभर काळ्याफिती लावून प्रतीकात्मक निषेध करण्यात येणार आहे, तर गुरुवारी पशुवैद्यकीय अधिकारी सामूहिक रजा आंदोलन करणार असून जिल्हाधिकारी कार्यालयात एकत्र जमून निवेदन देणार आहेत. शुक्रवारी शासकीय अहवाल सादर करणे बंद करणार आहेत, तर नऊ तारखेला विविध मागण्यांसाठी पशुवैद्यकीय संघटना राज्यभर एक दिवशीय साखळी उपोषण करणार आहे. आंदोलनाची ही रूपरेषा संघटनेचे अध्यक्ष डॉ. अनिल गडाख आणि सरचिटणीस डॉ. किरण देवकाते, डॉ. संदिप शिंदे, डॉ.रणजीत शेजुळ, डॉ.प्रदीप आघाव,महाराष्ट्र राज्य राजपात्रित पशुवैद्यकीय संघटना बीड यांनी दिली.

# पालखेड विद्यालयास तब्बल चार लाख वीस हजार रुपयांच्या बॅंचेसची भेट

## उद्योजक सुनील रुंगठा यांच्यासह इतर दानशूरांचा मोलाचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी एक स्तुत्य उपक्रम राबवत पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयास तब्बल चार लाख वीस हजार रुपयांच्या बॅंचेसची भेट देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे विद्यालयातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होणार असून विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या सुविधेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे.

भिवंडी येथील रुंगठा सिझिंग वर्क्स प्रोसेसर्सचे उद्योजक सुनील रुंगठा यांनी त्यांच्या मातोश्री स्व. विमलादेवी उमाशंकर रुंगठा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कंपनीच्या सीएसआर निधीतून दोन लाख ऐंशी हजार रुपये किमतीचे १०० बॅंचेस विद्यालयास भेट दिले. शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे मूळ आहे, या भावनेतून ग्रामीण भागातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी काहीतरी योगदान द्यावे, या उदात्त हेतूने त्यांनी हा निर्णय घेतला.

या उपक्रमामुळे विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना एकाच वेळी बसण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. वर्गखोल्यांमध्ये शिस्तबद्धता वाढण्यास मदत होणार असून विद्यार्थ्यांना अधिक आरामदायी वातावरणात शिक्षण घेता येणार आहे. परिणामी शाळेच्या एकूण शैक्षणिक वातावरणात सकारात्मक बदल घडून येणार आहे.

माजी विद्यार्थ्यांचा समन्वयातून पुढाकार या सामाजिक उपक्रमासाठी समन्वय साधण्यात पालखेड विद्यालयाचे माजी विद्यार्थी व ठाणे येथील ऊर्जा विभागाचे सहाय्यक विद्युत निरीक्षक अर्जुन विश्वनाथ जाधव




तसेच ग्लोबल ऑपरेशन प्रोजेक्ट मॅनेजर संतोष काळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

दानशूर व्यक्तींनी दाखविलेल्या उदारतेबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे व मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले. समाजातील सक्षम व्यक्तींनी शिक्षण क्षेत्राला सहकार्य करून सामाजिक उत्तरदायित्व पार पाडावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

यांचीही एक लाख चाळीस हजार रुपयांच्या ५० बॅंचेसची भेट उपक्रमात इतर दानशूर व्यक्तींनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. डोंबिवली येथील उद्योजक नारायण कुलकर्णी, मुंबई येथील ऊर्जा विभागातील विद्युत निरीक्षक निलेश मदाने, सुधीर राठोड, भिवंडी येथील ठेकेदार राजू चौबे तसेच पालखेड विद्यालयाच्या माजी प्रयोगशाळा सहाय्यक शोभाताई विश्वनाथ जाधव यांनी प्रत्येकी २८ हजार रुपये किमतीचे १० बॅंचेस याप्रमाणे एकूण ५० बॅंचेस (एक लाख चाळीस हजार रुपये) विद्यालयास भेट दिले.


या सर्वांच्या सामूहिक योगदानामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात एक भक्कम आधार निर्माण झाला आहे. शिक्षणाच्या मंदिरासाठी दिलेल्या या योगदानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# श्री सदस्यांनी राबवले स्वच्छता मोहीम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

: कामोठे समितीतील श्री सदस्यांनी पनवेल तालुक्यातील चिंद्रण, आंबे, शिरवली, मोहोदर, कुत्तरपाडा, माहाळुगी, चिरड,पाली उसाठणे,बुर्दुळ,कुंभारली नितळस, वळण, पालेबुद्रुक, नेवाळी. आदी २६ गावामध्ये स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये १३५७ सदस्यांनी भाग घेऊन ४१००किलो ओला कचरा व २३०० किलो सुका कचरा गोळा करण्यात आला.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त ठीक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या उपक्रमात तब्बल १३५७ स्वयंसेवकांनी सहभाग घेत अनेक ठिकाणचा परिसर स्वच्छ केला. शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलीस चौकी, स्मशानभूमी परिसराची यावेळी स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेदरम्यान ६४०० किलो कचरा गोळा करण्यात आला. यावेळी गावांचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, डॉक्टर, स्थनिक नागरिक, महिला यांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे गेली अनेक वर्षे रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, आपत्तीग्रस्तांना मदत अशा विविध उपक्रमातून समाज हिताचे कार्य सातत्याने केले जात आहे.




# गुणवंत कामगार डॉ. प्रभाकर कांबळे यांना " मी मराठी राज्यभाषा स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानीत

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**

: मैत्री संस्था व उत्प्रेरक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त मी मराठी लोक चळवळ अभियान अंतर्गत मी मराठी निमंत्रिताचे कवी संमेलन व " मी मराठी राजभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार " वितरण कार्यक्रमात वनिता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गुणवंत कामगार डॉ.प्रभाकर तुकाराम कांबळे , महानंदाचे कर्मचारी व गुणवंत कामगार केरबा हरिबा डावरे, भांडुप चे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व गुणवंत कामगार बाळकृष्ण तावडे ,संजय तावडे, महेंद्र ब्रीद लालबागचे गुणवंत कामगार प्रसन्न परकर, सम्यक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र जाधव,




अष्टपैलू कलाकार राजेंद्र सावंत , मंगलदीप पतपेढीचे अध्यक्ष राजू सोनकांबळे व सिडकोतील अधिकारी वैशालीताई कांबळे आदींनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल " मी मराठी राज्यभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार" प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित, शिवाजीराव देशमुख फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष चारुशीला देशमुख, संभाजीराव राजे जाधवराव , सेन्सार फिल्म बोर्डाचे विलास खानोलकर ,आशादीप महिला मंडळाच्या अध्यक्षा आशाताई भोईर आदी मान्यवर च्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मैत्री संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे सर्वेसर्वा सुरज भोईर होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला निमंत्रितांचे कवी संमेलन तसेच महाराष्ट्राचे लोकशाहीर दत्तात्रय म्हात्रे व सहकारी यांचा सदाबहार मराठी स्मृती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला तसेच मानखुर्द येथील अंगणवाडी सेविकानी गाण्याच्या तालावर नृत्य सादर केले असून कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित मध्ये पोलीस मित्र दिलीप नारद , आदर्श शिक्षिका स्पुहा सुरेश इंदू ,डॉ. संदीप नेवळेकर, ज्येष्ठ कवी मोहन जाधव, प्रियांका भोईर कांबळे डॉ. संतोष कांबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये गिरणगावातील

करीरोड भागातील महाराष्ट्र हायस्कूल मैदान जवळील मनपा मजदूर कार्यालयाच्या बाळ दंडवते सभागृहात संपन्न झाला असून यावेळी प्रमुख मान्यवरांनी व निमंत्रित कवीनी मराठी भाषा वाचविण्यासाठी काय करावे याविषयी आपले विचार मांडले कार्यक्रमाला बहुसंख्येने विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी डॉ. संतोष कांबळे यांनी सर्वांचे आभार मानलै.

# पनवेल तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

: महसूल विभाग आपल्या दारी राज्यातील सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाच्या निर्देशानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रायगड जिल्हयात या अभियानाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यात या अभियानाचे आयोजन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे व निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल व मिनल भोसले-भामरे, तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, पनवेल यांच्या नेतृत्वाखाली मंडळस्तरावर करण्यात आले आहे.

या अभियानाचे प्रमुख उद्दीष्ट महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान व्हावे, या उद्देशाने नागरिकांच्या महसूली तक्रारीचे तात्काळ निराकरण करणे, प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जलदगतीने निर्णय करणे, प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे तसेच विविध दाखल्यांशी संबधित अडचणी दूर करणे यासाठी प्रत्येक जिल्हयातील तालुक्यात मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्व तयारी येणार असून प्रत्यक्ष शिबिरांची सुरुवात ७ मार्चपासून होणार आहे. तहसिल कार्यालय पनवेल यांचेमार्फत पनवेल तालुक्यात तळोजे येथे सात मार्च, कळंबोली येथे 14 मार्च , पळस्पे येथे 17 एप्रिल, ओवळे येथे 10 एप्रिल, पनवेल येथे आठ मे रोजी मंडळनिहाय समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल तालुक्यातील तृतीयपंथी यांचेकरीता सर्व योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तात्काळ सेवा, अकृषक तरतुदीसंदर्भातील (NA) सुधारणा बाबत मार्गदर्शन करणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे, वारस नोंद प्रक्रिया, कालबाहय बोजे कमी करणे, उत्पनाचे व जातीचे दाखले वाटप करणे, जमिनीचे तुकडेबंदी कायदयातील सुधारणा, एक वेळेचे अधिमुल्य भरण्याची सोपी व्यवस्था, डिजीटल स्वाक्षरीयुक्त ७/१२ उतारेबाबत नागरीकांचे प्रबोधन, ॲग्रीस्टॅक या सेवा समाधान शिबीरामध्ये सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. पनवेल तहसिल कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपले मंडळ मुख्यालयी दिलेल्या तारखाना कागदपत्रांसह उपस्थित रहावे व या अभियानामध्ये मिळणारे सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, तहसिलदार पनवेल मिनल भोसले- भामरे यांनी केले आहे.

# होळी लहान पुरणपोळी दान

**डॉ सुनिल भगत प्रतिनिधि नागपूर दक्षिण**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे आयोजित विविध सामाजिक उपक्रम घेण्यात येतात. होळी सणाच्या निमित्ताने विविध होळया शहरात आयोजित करण्यात येतात आणि त्यामध्ये सहभागी होण्यासाठी एकत्र आलेल्या महिला आणि पुरुष मंडळी नैवद्य म्हणून होळी पुरणपोळी अर्पण करतात, आणि एकप्रकारे अन्नाला अग्नी देण्यात येतो.

त्याऐवजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे सदस्य हया पुरणपोळ्या जमा करून ज्या लोकांना ह्या दिवशी गरीबीमुळे किंव्हा आश्रमांमध्ये मिळू शकत नाही. त्यांना वाटप करण्यात येते. दिनांक २ मार्च २०२६ रोजी रात्री ह्या पुरणपोळया विविध ठिकाणी जमा करण्यात आल्या. आणि शंकरपुर स्थित डॉ. गजघाटे




संचालित "मधुरांगण" या डिम्नेशिया पीडित रुग्ण आश्रम मधील रुग्णांना सकाळी १० वाजता दिनांक ३ मार्च २०२६ वाटप करण्यात आले. ह्या मुळे सर्व रुग्णांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता.

ह्या अभियानामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर येथील प्रधान सचिव डॉ सुनिल भगत, मधुरांगण संचालक डॉ. वि.जी. गजघाटे,बहुजन सौरभ निवासी संपादक संध्या राजूरकर, उमेश चिट्टे, देवयानी भगत, मंगला गाणार, साहिल , पूनम आणि इतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# हॉकर्स मुक्त" बर्डी बाजारपेठे साठी संघर्षमय योगदानाऱ्यांचा सत्कार (सीताबर्डी व्यापारी संघटनेची दखल)



**दैनिक युवक आधार, राहुल मडावी, नागपूर**

स्व. चंद्रकांत रघाटे तसेच विजय महाडिया या संस्थापक सदस्यांनी 1989 मध्ये स्थापन केलेल्या या सीताबर्डी व्यापारी संघटनेला 37 वर्षे होऊन चुकलेत. व्यापाऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे, त्यांच्या हिताकरिता सर्वतोपरी प्रयत्न करणे असा सुरळीत व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना रस्त्यावरील फेरीवाले, विक्रेते यांच्या अतिक्रमणामुळे भयंकर त्रास सुरू झाला. बर्डी बाजारपेठ म्हणजे दररोजची जत्राच अशीच येथील ख्याती होती. यात भर म्हणजे असमाजिक तत्त्वा द्वारा पर्स लंपास करणे, धक्काबुक्की करणे, धमकावणे, शुल्कक कारणांवरून वाद घालण्या सारखे प्रकरण व्हायला लागले. परिणामी या संघटनेने विशेष कमिटी स्थापन करून प्रशासनास वेळोवेळी निवेदन देऊन आपला लढा नियमित सुरू ठेवला. हॉकर्स विरुद्ध व्यापारी यांचा या लढ्यात 2002 मध्येच बर्डी मेन रोड हॉकर्स झोनमुक्त म्हणून कोर्टाचे आदेश सुद्धा आले होते, तरीसुद्धा परिस्थिती जैसे थे होती. शेवटी महापालिका, पोलीस प्रशासन आणि संघर्ष करणारे हे व्यापारी यांच्या अथक प्रयत्नातून उल्लेखनीय परिवर्तन हे समृद्धीचे सुंदर केंद्र बनले. हे परिवर्तन काही खास व्यक्तींच्या अथक परिश्रमाचे फळ आहेत ज्यांनी या व्यापाऱ्यांना एक नवीन जीवन दिले. या त्यांच्या योगदानाबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. या समारंभाचे प्रमुख पाहुणे नगरसेवक, वीरेंद्र( विकी) कुकरेजा तर इतर माननीय पाहुणे नगरसेवक, योगेश पाचपोर, नगरसेवक, सुनील हीरणवार, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष, विनय दाणी ,पूजा पाठक, धनश्री देशपांडे होत्या. 28 फेब्रुवारी 2026 ला सायंकाळी वर्ल्ड ट्रेड सेंटर, सिताबर्डी, नागपूर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन सीताबर्डी व्यापारी संघटनेचे सचिव, हुसेन एन अजानी यांनी केले.

# रुई जि.प. शाळेची राज्याबाहेर ज्ञानयात्रा; 'अविष्कार' अभियानातून विद्यार्थ्यांची राजस्थान स्वारी



**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी:-**

रुई येथील जिल्हा परिषद शाळेतील २३ विद्यार्थी व ३ शिक्षकांची जिल्हा परिषद आयोजित केंद्रीय प्रकल्पांतर्गत समग्र शिक्षा राष्ट्रीय अविष्कार अभियान अंतर्गत शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली. या राज्याबाहेरील ज्ञानयात्रेमुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, धार्मिक व वैज्ञानिक स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी चित्तौडगड किल्ला, आजमेर किल्ला, सांवरिया सेठ मंदिर, कनक बाग, जंतर मंतर जयपूर, विभागीय विज्ञान केंद्र जयपूर तसेच महाकालेश्वर मंदिर आदी महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्या.

जंतर-मंतर येथील खगोलशास्त्रीय उपकरणांची माहिती घेताना विद्यार्थ्यांनी प्राचीन विज्ञानाची ओळख करून घेतली, तर विज्ञान केंद्रातील विविध प्रयोगांमुळे त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनात भर पडली. धार्मिक स्थळांच्या1 भेटीमुळे अध्यात्मिक जाणिवाही अधिक दृढ झाल्या.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या उपजत कुतूहलाला चालना मिळाली असून प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण अधिक प्रभावी ठरले.

विद्यार्थ्यांसमवेत समग्र शिक्षा अभियान प्रमुख अनिता देशमुख, मुख्याध्यापिका विजया थेटे, रतन शेळके व सौ. कमल गंभीरे यांनी मार्गदर्शन केले.

या राज्याबाहेरील ज्ञानयात्रेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळाल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# निफाड तालुक्याचा मान उंचावला; सोनेवाडी खुर्द राज्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी**

पंचायत प्रगती निर्देशांकात राज्यात प्रथम क्रमांक पटकावत निफाड तालुक्यातील सोनेवाडी खुर्द ग्रामपंचायतीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामपंचायतीच्या सर्वांगीण व पारदर्शक कामगिरीची दखल घेत हा मान मिळाल्याने संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




पंचायत प्रगती निर्देशांकांतर्गत प्रशासनिक कार्यक्षमता, पारदर्शकता, विकासकामांची गुणवत्ता व परिणामकारकता, नागरिकांचा सहभाग, त्यांच्या मागण्यांचे समाधान तसेच आर्थिक व्यवस्थापन या निकषांवर मूल्यमापन केले जाते. या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सोनेवाडी खुर्द ग्रामपंचायतीने राज्यात अव्वल स्थान पटकावले.

या यशामागे नाशिक जिल्हा परिषद प्रशासनाचे मार्गदर्शन लाभले. मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा पडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) महेश पाटील, पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनिल पाटील तसेच विस्तार अधिकारी संजय पवार, प्रशांत बोरसे आणि राजेश थोरात यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ग्रामपंचायतीच्या यशात सरपंच लता आव्हाड, उपसरपंच योगिता गायकवाड, सदस्य अशोक आव्हाड, पंडित मोरे, प्रकाश बांगर, छाया सानप, नंदा सानप, सपना सानप यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी आम्रपाली देसाई आणि कर्मचारी नंदू सानप व अरुण सानप यांचे विशेष योगदान राहिले आहे.

राज्यात प्रथम क्रमांक मिळाल्याने ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, या यशामुळे इतर ग्रामपंचायतींसाठीही एक आदर्श निर्माण झाला आहे.

# पालोदमध्ये 'डीजे' अन् पाण्याचा अपव्यय टाळून आदर्श 'रंगोत्सव' साजरा !
## ग्रामस्थांच्या शिस्तीने पोलीस प्रशासनाचा ताण हलका; साध्या रंगात न्हाला परिसर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सण-उत्सव साजरे करताना होणारा कर्णकर्कश आवाज, पर्यावरणाची हानी आणि पाण्याचा बेसुमार अपव्यय टाळून, सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील ग्रामस्थांनी यंदा एक नवा आणि स्तुत्य आदर्श प्रस्थापित केला आहे. दरवर्षी मोठ्या धुमधडाक्यात साजरा होणारा होळीचा हा रंगोत्सव (धुलिवंदन) यंदा कोणतीही हुल्लडबाजी न करता, अत्यंत साध्या पद्धतीने आणि केवळ नैसर्गिक रंगांचा वापर करून साजरा करण्यात आला. ग्रामस्थांच्या या प्रगल्भतेमुळे पोलीस प्रशासनावरील ताणही पूर्णपणे हलका झाला आहे.

जुनी रीत मोडली; डीजे आणि पाण्याचा अपव्यय टाळला

आजकाल सण म्हटलं की 'डीजे'च्या भिंती आणि पाण्याचे टँकर हे समीकरण झाले आहे. मात्र, यंदा पालोदमध्ये चित्र पूर्णपणे वेगळे होते. गावकऱ्यांनी आणि विशेषतः तरुणांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत डीजे, बँड-बाजा आणि पाण्याचा अनावश्यक वापर टाळण्याचा निर्णय घेतला. अबालवृद्धांनी आपापल्या परिसरात राहूनच

अत्यंत साध्या पद्धतीने एकमेकांना गुलाल आणि कोरडे रंग लावून उत्सवाचा आनंद लुटला. कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा ध्वनी प्रदूषण नसल्याने उत्सवाचे पावित्र्य आणि मूळ आनंद टिकून राहिला.

पोलीस प्रशासनाकडून कौतुक आणि स्नेहभाव रंगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज होते. मात्र, पालोद गावातील ही शिस्त पाहून बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुखद धक्का बसला. कुठेही कडक कारवाईची किंवा वादाची परिस्थिती निर्माण झाली नाही. ग्रामस्थांचा हा सकारात्मक प्रतिसाद आणि प्रशासनाला दिलेले सहकार्य पाहून पोलीस बांधवांनी समाधान व्यक्त केले. या 'आदर्श' उत्सवाचे कौतुक करत पोलिसांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधून या मैत्रीपूर्ण वातावरणाचा आनंद घेतला.



एक नवा पायंडा नेहमीच्या गोंधळापेक्षा यंदाचा हा 'शांत आणि पर्यावरणपूरक' उत्सव पालोदच्या इतिहासात सकारात्मक नोंद करून गेला आहे. अनावश्यक खर्च आणि पर्यावरणाची हानी टाळून ग्रामस्थांनी प्रशासनाचा जो सन्मान राखला, त्याचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. पोलीस आणि जनता यांच्यातील हा समन्वय आगामी काळातील इतर उत्सवांसाठी एक दीपस्तंभ ठरणार आहे.

# पनवेल तालुक्यातील ठोंबरेवाडी येथे कुटुंबाला मौफत घराची अनोखी भेट

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

विश्वास, कृतज्ञता आणि प्रगतीच्या एका सुवर्णक्षराचे साक्षीदार होत, गोदरेज प्रॉपर्टीजने एक लाख घरांच्या विक्रीचा ऐतिहासिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या यशाचे अनोखे सेलिब्रेशन म्हणून कंपनीने नवी मुंबईतील नेरुळ येथील रहिवासी असलेल्या नैना कुटुंबाला एक घर विनामूल्य भेट दिले आहे. ग्राहकांनी गेल्या अनेक वर्षांपासून गोदरेज समूहावर दाखवलेला अढळ विश्वास आणि त्यांच्यासोबत असलेल्या घट्ट नात्याचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम राबवला आहे. पनवेल तालुक्यातील ठोंबरेवाडी येथे गोदरेज सिटीमध्ये साकारलेले हे घर गोदरेज प्रॉपर्टीजच्या मूळ विचारधारेचे प्रतीक आहे. असून त्या ठिकाणी हा सोहळा संपन्न झाला.

प्रत्येक घर हे प्रगती, आकांक्षापूर्ती आणि आपलेपणाची अनोखी कहाणी असते अशी कंपनीची धारणा आहे. या खास प्रसंगाचे औचित्य साधून कंपनीने लाखों मे एक ही विशेष मोहिम सुरु केली आहे. ही मोहिम गोदरेजवर विश्वास ठेवून घराची निवड करणा-या १ लाख कुटुंबांना समर्पित आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून कंपनीने एका ग्राहकाला हक्काचे घर भेट दिले आहे. अत्यंत पारदर्शक आणि चोख प्रक्रियेतून या लाभार्थ्याची निवड करण्यात आल्याचे कंपनीच्यावतीने सांगण्यात आले. ही कोणतीही स्पर्धा किंवा लॉटरी नसून, कंपनीच्या या सशस्वी प्रवासात सोबत असलेल्या ग्राहकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उचलले पाऊल आहे.

गोदरेज प्रॉपर्टीजचे कार्यकारी अध्यक्ष पिरोजशा गोदरेज म्हणाले,' हा क्षण म्हणजे एक लाख कुटुंबांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास, श्रध्दा आणि त्यांच्या स्वप्नपूर्तीचा मोठा सोहळा आहे. आम्ही सुपूर्द केलेली प्रत्येक घराची किल्ली ही आशेची एक नवी गोष्ट सांगते. आम्ही उभारलेली प्रत्येक वसाहत ही भारताच्या बदलत्या आकांक्षांचे प्रतिबिंब आहे. एक लाख ग्राहकांचा हा टप्पा गाठल्यामुळे आम्हांस अभिमान आणि कृतज्ञता अनुभवता येत आहे. याचसोबत आता अगोदरपेक्षाही जास्त आत्मीयतेने आणि पूर्ण निष्ठेने काम करण्याची आमची जबाबदारी अधिक वाढली आहे, याची जाणीव होत आहे.''

गोदरेज प्रॉपर्टीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव पांडे म्हणाले, 'लाखों में एक हा उपक्रम आमच्यावर विश्वास ठेवणा-या प्रत्येक घरमालकाचा सन्मान करण्याचा आमचा एक प्रयत्न आहे. घर खरेदीच्या प्रत्येक निर्णयामागे प्रबळ इच्छाशक्ती, भावना आणि अपार कष्ट दडलेले असतात. गोदरेज प्रॉपर्टीला मानाचे स्थान मिळवण्यात योगदान देणा-या सर्व ग्राहकांचे मनापासून आभार व्यक्त करण्यासाठी आम्ही हा उपक्रम राबवत आहोत. भविष्याचा वेध घेताना समृद्ध जीवनशैली, नाती बहरणा-या वास्तूंची निर्मिती करणे जेणेकरुन लोकांच्या दैनंदि आयुष्यात आनंद निर्माण होईल, हेच आमचे ध्येय आहे.'




# शिमग्याच्या ज्वाळांतून पेटणार नाट्यज्योत; श्रीवर्धन–म्हसळ्यात १७ नाटकांचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ**

कोकणात सण हे केवळ दिनदर्शिकेतील दिवस नसतात, केवळ आनंदाचे क्षण नसतात. तर ते संस्कृतीचे उत्सव असतात ,हृदयाचे ठोके असतात, भावनांचे उसासे असतात आणि मातीशी जोडलेली ओळख असते. कोकण या भूमीत गणेशोत्सव असो किंवा शिमगा प्रत्येक सण श्रद्धा, संस्कृती आणि आपुलकीच्या धाग्यांनी विणलेला असतो. "देव आपल्या भक्तांच्या घरी येतो" ही अढळ श्रद्धा मनात बाळगून कोकणवासी हे सण केवळ साजरे करत नाहीत, तर ते जगतात,अनुभवतात आणि पुढील पिढीकडे जतन करून देतात. मुंबई, पुणे आणि देशाच्या कानाकोपऱ्यात उपजीविकेसाठी गेलेली चाकरमानी माणसं या दिवसांत पुन्हा आपल्या मातीच्या ओढीने गावाकडे धाव घेतात. बंद दरवाजे उघडतात, ओस पडलेली घरं पुन्हा हसतात, अंगणात तुळशीसमोर दिवे लागतात आणि गावात पुन्हा चैतन्य फुलतं.शिमगा म्हणजेच होळी उत्स्फूर्त आनंद, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक एकजुटीचा सण. गावाच्या चौकात उभी असलेली होळी, तिच्या ज्वाळांमध्ये जळणाऱ्या दुःखांच्या सावल्या आणि त्या राखेतून उगवणारी नव्या आशेची पहाट हे दृश्य मनाला विलक्षण स्पर्शून जातं. ढोल-ताशांचा गजर, फुगड्या, पारंपरिक खेळ, रंगांची उधळण आणि देवदेवतांच्या पालख्या घराघरांत दर्शनासाठी फिरताना भक्ती आणि उत्साह यांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळतो. आणि या सांस्कृतिक उर्जेच्या लाटेतूनच सुरूवात होते एका भव्य नाट्यमहोत्सवाची!




श्रीवर्धन–म्हसळा तालुक्यांत रंगणार नाट्यसोहळा

श्रीवर्धन आणि म्हसळा तालुक्यांतील विविध गावांत शिमग्याच्या निमित्ताने यंदा तब्बल १७ नाट्यकलाकृती सादर होणार आहेत. गावोगावी रंगमंच सजले आहेत, नेपथ्य उभारले जात आहे, प्रकाशयोजना तपासली जात आहे आणि कलाकारांच्या तालमी रंगात आल्या आहेत. बोर्ली पचंतन, शिस्ते, वडवली, मेंदडी आणि खरसई या गावांतील विविध मंडळे, खोती आणि समाज यांच्या संयुक्त विद्यमाने हा सांस्कृतिक जल्लोष रंगणार आहे.बोर्ली पचंतन येथे सादर होणारी नाटके :अंगार,फरारी, कहाणी रक्ताच्या नात्याची,हे चाललंय काय? तर त्याच गावाला लागून असलेल्या शिस्ते या गावात शाश्वत अधांतर,बेबल्याचो घोव,सप्तपदी ही दुर्दैवाची. ही नाटके सादर होणार आहेत तर त्याच्याच पुढे असलेल्या वडवली या गावात दोष कोणाचा,अघोरी,स्वराज्याचा शिवसंग्राम,इस्टेटीसाठी खून,पैसा झाला खोटा ही ही नाटके सादर होणार आहेत तर म्हसळा तालुक्यातील मेंदडी आणि खरसई या गावात नातं वैरी रक्ताचं, हृदय बापाचं,एक होतं गाव. कथा एका दुर्दैवी बापाची अशी सामाजिक आशय, कौटुंबिक संघर्ष, ऐतिहासिक अभिमान आणि मानवी नात्यांचे सूक्ष्म भावविश्व उलगडणारी एकूण १७ नाटके स्थानिक आणि मुंबई मंडळातील हौशी कलाकार तसेच काही टिव्ही मालिकांमधील अभिनेत्री यांच्या सहभागातून सादर केली जाणार आहेत.

या रंगमंचावरून केवळ मनोरंजन होत नाही; तर घडतात भावी कलाकार, वादक, प्रकाश संयोजक, नेपथ्यकार, दिग्दर्शक आणि अभिनेते. गावाच्या मातीतील ही कला पुढे जाऊन संपूर्ण महाराष्ट्रात आपली छाप उमटवते आणि आपल्या गावाचे नाव अभिमानाने उज्ज्वल करते.

खरंतर, या नाट्यपरंपरेचे गांभीर्य आणि गुणवत्ता पाहता महाराष्ट्र राज्य नाट्य परिषद यांसारख्या संस्थांनी या कलाकृतींचे अवलोकन करून स्थानिक मंडळांना प्रोत्साहन द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. योग्य मार्गदर्शन आणि व्यासपीठ मिळाल्यास येथील ग्रामीण रंगभूमी राज्यस्तरावर निश्चितच झळकू शकते.

शिमग्याच्या ज्वाळांमधून उगवणारी नवचैतन्याची ही नाट्यज्योत आता श्रीवर्धन आणि म्हसळा तालुक्यात तेजाळणार आहे. श्रद्धा, उत्साह आणि कलेचा संगम अनुभवण्यासाठी नाट्यरसिकांना ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

कोकणची परंपरा, गावांची एकजूट आणि कलेवरील निस्सीम प्रेम यांचा हा सोहळा खऱ्या अर्थाने शिमग्याची सांस्कृतिक आराधना ठरणार आहे.

# लाखनीत रंगांची उधळण; मैत्रीचा आनंद द्विगुणित.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा :**

लाखनी शहरात आज रंगपंचमीचा उत्सव उत्साह, जल्लोष आणि मैत्रीच्या रंगांनी नटलेला पाहायला मिळाला. सकाळपासूनच शहरातील विविध चौक, मुख्य रस्ते आणि परिसरात तरुणांची गर्दी



उसळली होती. एकमेकांना अबीर-गुलाल लावत, हास्य-विनोद करत आणि आनंदाने घोषणाबाजी करत तरुणांनी रंगोत्सव साजरा केला.विशेषतः शहरातील मुख्य मार्गांवर मित्रमंडळींचे गट एकत्र येत "बुरा ना मानो होली है" म्हणत रंगांची उधळण करत होते. चेहऱ्यावर रंग, ओठांवर हसू आणि हातात मैत्रीची घट्ट पकड असे आनंददायी दृश्य सर्वत्र दिसत होते. अनेकांनी नैसर्गिक रंगांचा वापर करत सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचा संदेश दिला.

युवकांनी डीजेच्या तालावर नृत्य करत जल्लोष केला. काही ठिकाणी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात रंगोत्सव रंगला. लहान मुले, युवक आणि नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलिस यंत्रणा सतर्क होती.

# जाहिरातीतून एसटी कमविणार २५० कोटी रुपये.. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी 'लालपरी' आता केवळ प्रवाशांनाच नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.



मंत्री सरनाईक म्हणाले, " एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर पसरलेली आहेत. सुमारे १२ हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे." चांद्यापासून बांदयापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदयस्थितीत कार्यरत असलेले जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नविन परवानाधारकांकडे जाणार आहेत.सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी सुमारे २२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. अशाप्रकारे "तिकीट विक्रीव्यतिरिक्त विविध पर्यायी स्रोतांमधून उत्पन्न निर्माण झाले, तर एसटीला भविष्यात तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही," असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

# शिवसेना शहरप्रमुखांच्या खिशावर चोरट्यांचा डल्ला; अवघ्या ४८ तासांत आरोपी गजाआड

**धडाकेबाज पोलिस कारवाई : ५० हजारांची रोकड चोरीचा पर्दाफाश, स्थानिक गुन्हे शाखेची विजयी कामगिरी**

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

शिरपूर जैन (वाशिम) : शिवसेना शहरप्रमुख कैलास राऊत यांच्या खिशावर डल्ला मारत ५० हजार रुपये चोरी करणाऱ्या चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखा व शिरपूर पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत गजाआड केले. पोलिसांनी दाखविलेल्या तत्परता, वेगवान तपास व अचूक नियोजनामुळे आरोपीला अटक करण्यात यश आले असून या धडाकेबाज कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अब्दुल अरिफ मोहम्मद रसूल (वय २६, रा. डापकी रोड, अकोला) असे आहे.दि. २० फेब्रुवारी रोजी श्री समर्थ जानगीर महाराज संस्थानाच्या वतीने भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला राज्यासह परराज्यातील नामांकित पैलवान उपस्थित होते. विशेषतः नेपाळ येथील पैलवान स्टेजवर येताच त्याला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्याने कैलास राऊत यांच्या खिशाला कात्री लावून ५० हजार रुपये लपास केले होते.




घटनेनंतर शिरपूर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखा व शिरपूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती व संशयितांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवत आरोपीचा माग काढण्यात आला.

तपासादरम्यान आरोपी मालेगावकडे येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी अकोला नाका परिसरात सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून चोरीच्या घटनेचा यशस्वी उलगडा करण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणेदार केशव वाघ, पोलीस उपनिरीक्षक इम्रान खान पठाण, पोलीस उपनिरीक्षक योगेश धोत्रे तसेच स्थानिक गुन्हे शाखा व शिरपूर पोलिसांच्या संयुक्त पथकाने पार पाडली.

**सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी आपली रोकड व मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात. कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी.**

**— केशव वाघ**
**ठाणेदार, शिरपूर पोलीस स्टेशन**

**जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा सतर्क आहे. संशयास्पद हालचालींची माहिती नागरिकांनी तात्काळ पोलिसांना द्यावी.**

**— योगेश धोत्रे**
**एपीआय, स्थानिक गुन्हे शाखा**

**पोलिसांनी अतिशय जलद गतीने तपास करून आरोपीला अटक केली. या कारवाईमुळे पोलिस प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.**

**— कैलास राऊत**
**शहरप्रमुख, शिवसेना, शिरपूर**

## नोंदणीकृत जेष्ठ नागरिक व दिव्यांग साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**मानोरा तालुका प्रतिनिधी नितीन आढाव**

तालुक्यात नोंदणी केलेल्या दिव्यांग बंधू भगिनी तसेच 60 वर्षा वरील जेष्ठ नागरिक यांना सहायभूत साधनाचे ADIP(अपंग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे) आणि RVV(राष्ट्रीय वयोश्री योजना) अंतर्गत साहित्य वाटप होणार आहे माननीय खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या प्रयत्नाना यश आले आहे त्यांनी मागील वर्षी दिव्यांग बांधवांची नोंदणी करून घेतली होती तरी आता सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व मुंबई जिल्हा प्रशासन – यवतमाळ व वाशिम आणि ईश्वर फाउंडेशन दिग्रस यांच्या वतीने साहित्य वाटप होणार आहे तरी त्या मध्ये व्हील चेअर,श्रवणयंत्र, काठी,वॉकर,ट्रायसायकल आदि साहित्य वितरण होणार आहे तरी दि.05 मार्च 2026 या तारखील पंचायत समिती मानोरा येथे नोंदणीकृत बंधू भगिनी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग बंधू-भगिनी यांनी आपले सगळे कागदपत्र सोबत घेऊन येण्याचे आवाहन सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि नोंदणी प्रमुख यांनी केले आहे.

## कॉपीमुक्त अभियानासाठी प्रशासन सतर्क; जऊळका रेल्वे केंद्रावर मालेगाव तहसीलदांराची धडक.मोहीम

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

मालेगाव:-तालुक्यात दहावीच्या बोर्ड परीक्षांना सुरुवात झाली असून, त्या पारदर्शक आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष सूचनानुसार, तहसीलदार दीपक पुंडे यांनी मालेगाव तालुक्यातील विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देऊन पाहणी केली.

तहसीलदार पुंडे यांनी जवळका रेल्वे येथील शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयातील परीक्षा केंद्राला अचानक धडक दिली. यावेळी त्यांनी वर्गाची पाहणी करून केंद्रावर सुरू असलेल्या प्रक्रियेचा आढावा घेतला. परीक्षा केंद्रप्रमुख आणि पर्यवेक्षकांची संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केली की, परीक्षा प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. विद्यार्थ्यांनी निर्भयपणे परीक्षा द्यावी, परंतु कोणत्याही अनुचित प्रकाराला थारा देऊ नये, अशा क** सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावर्षी कॉपीमुक्त अभियानाला येथे चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. या मोहिमेत मंडळ अधिकारी नागेश घुगे, तलाठी धनंजय राऊ आणि महसूल कर्मचाऱ्यांचा समावेश होता. आगामी काळातही तालुक्यातील इतर केंद्रांवर भरारी पथकांकडून अचानक तपासणी केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या भूमिकेमुळे परीक्षा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत असल्याचे चित्र सध्यातरी आहे.

## नोंदणीकृत जेष्ठ नागरिक व दिव्यांग साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**मानोरा तालुका प्रतिनिधी नितीन आढाव**

तालुक्यात नोंदणी केलेल्या दिव्यांग बंधू भगिनी तसेच 60 वर्षा वरील जेष्ठ नागरिक यांना सहायभूत साधनाचे ADIP(अपंग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे) आणि RVV(राष्ट्रीय वयोश्री योजना) अंतर्गत साहित्य वाटप होणार आहे माननीय खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या प्रयत्नाना यश आले आहे त्यांनी मागील वर्षी दिव्यांग बांधवांची नोंदणी करून घेतली होती तरी आता सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व मुंबई जिल्हा प्रशासन – यवतमाळ व वाशिम आणि ईश्वर फाउंडेशन दिग्रस यांच्या वतीने साहित्य वाटप होणार आहे तरी त्या मध्ये व्हील चेअर,श्रवणयंत्र, काठी,वॉकर,ट्रायसायकल आदि साहित्य वितरण होणार आहे तरी दि.05 मार्च 2026 या तारखील पंचायत समिती मानोरा येथे नोंदणीकृत बंधू भगिनी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग बंधू-भगिनी यांनी आपले सगळे कागदपत्र सोबत घेऊन येण्याचे आवाहन सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि नोंदणी प्रमुख यांनी केले आहे.

# सामाजिक कार्यातील धगधगता ज्वाला प्रविण पट्टेबहादुर यांना राज्यस्तरीय 'सेवारत्न' पुरस्काराचा मान

### दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सन्मान; पुरस्कार तमाम जनतेला अर्पण — राज्यभर अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

वाशिम सामाजिक क्षेत्रात निःस्वार्थी भावनेने सातत्याने कार्य करत समाजपरिवर्तनाची मशाल पेटवणारे ग्राम केकतउमरा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रविण पट्टेबहादुर यांना राज्यस्तरीय 'सेवारत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन व पुरस्कार सोहळा वाशिम येथे दिनांक 28 फेब्रुवारी 2026 रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या भव्य सोहळ्यात सामाजिक चळवळीत उल्लेखनीय व जनहिताचे कार्य केल्याबद्दल प्रविण पट्टेबहादुर यांना आकर्षक स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. केंद्रीय आरोग्य मंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच भागवताचार्य परमपूज्य रमाकांतजी व्यास, अयोध्या मंदिर कोषाध्यक्षांचे बंधू गोविंद गिरी महाराज यांचे सान्निध्य, परमपूज्य गजानंद माऊली महाराज, डॉ. विश्वासराव आरोटे, वाशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा शिलाताई राठी, माजी नगराध्यक्ष अशोक हेडा, प्रदेश सरचिटणीस निलेश सोमानी, व्यापारी गिरिधारीलाल सारडा, व्यापारी मंडळ अध्यक्ष जुगल किशोर कोठारी, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे व ॲड. सुरेश टेकाळे आदी दिग्गज मान्यवरांच्या हस्ते हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

> **"हा 'सेवारत्न' पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नसून समाजसेवेची जबाबदारी अधिक वाढवणारी प्रेरणा आहे. माझ्यावर विश्वास ठेवून हा मान प्रदान करणाऱ्या आयोजक संस्थांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. समाजाच्या सर्व स्तरातील नागरिकांनी दिलेल्या पाठबळामुळेच हे कार्य शक्य झाले. पुढील काळातही शिक्षण, सामाजिक न्याय व जनकल्याणाच्या कार्यात अधिक जोमाने योगदान देत सर्वसामान्यांच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन. हा सन्मान मी तमाम जनतेला समर्पित करीत असून, त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी अखंड सेवा देत राहीन."**
> **– प्रविण पट्टेबहादुर**




प्रविण पट्टेबहादुर हे राजा प्रसेनजीत अल्पसंख्याक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून सरपंच सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश विभागीय समन्वयक म्हणूनही ते कार्यरत आहेत. सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या विविध उपक्रमांतून त्यांनी समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत उल्लेखनीय कार्य उभारले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत यापूर्वीही केंद्र शासन, राज्य शासन, विविध प्रशासकीय विभाग तसेच नामांकित फाउंडेशन, संस्था व सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

राज्यस्तरीय 'सेवारत्न' पुरस्कार प्राप्त झाल्याने प्रविण पट्टेबहादुर यांचे राज्यभरातून अभिनंदन होत असून सामाजिक क्षेत्रात त्यांच्या कार्याचा गौरव होत आहे. या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळाले असून भविष्यातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला आहे.

# त्या' शिक्षकांचे वेतन अदा करण्याचे आदेश माजी आ. श्रीकांत देशपांडे यांचा आक्रमक पुढाकार



**दैनिक युवक आधा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

वाशिम:-संस्थेकडून निलंबित न केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी 2020 चे वेतन थांबविणे योग्य असल्याचे स्पष्ट करत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद वाशिम यांनी वेतन अदा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासाठी माझी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांनी आक्रमक पुढाकार घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी प्रा. दिलीप जोशी 600 कडून शिक्षक उपस्थित होते.

संस्थेकडून वेतन थांबविण्याबाबत पाठविण्यात आलेल्या याद्यांवरून हा विषय तपासण्यात आला. मात्र महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा अटी अधिनियम 1981 मधील नियम 33 ते 35 नुसार अधिकार संबंधित व्यवस्थापनाकडे असून, त्या अनुषंगाने योग्य प्रक्रिया झालेली नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित पत्र रद्द करण्यात येत असून, यादीतील सर्व निलंबन केलेल्या कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी 2026 चे वेतन अनुदान अदाकर यांचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित शाळा व यंत्रणांनी तात्काळ कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद आहे. काय आहे प्रकरण, शिक्षकांना निलंबित करण्याचे धोरण.

जिल्ह्यात सुरू असलेल्या उच्च माध्यमिक इयत्ता बारावी परीक्षेदरम्यान काही केंद्र सामूहिक कॉपींचा प्रकार उघडकीस आल्यानंतर माध्यमिक शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित परीक्षा केंद्रातील 38 शिक्षक व एका शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची फेब्रुवारी 2020 महिन्याचे वेतन रखडनेवण्याचे निर्देश माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील 74 परीक्षा केंद्रात 10 फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू आहे. परीक्षा दरम्यान काही केंद्रावर विद्यार्थ्यांना कॉपीस मदत केल्याचे तसेच गैरप्रकारांना प्रोत्साहन दिल्याचे प्रकार समोर आले आहे. याप्रकरणी संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांना निलंबित करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाने संबंधित संस्था व शाळांना नोटीसा बजावल्या असून, संस्थांकडून निलंबना बाबतचा अहवाल अद्याप प्राप्त न झाल्याने शिक्षण विभागाने श्रेणीची कारवाई केली आहे. संबंधित शिक्षकांचे वेतन देयकात निलंबन प्रस्तावित शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांचे नाव नमूद नसल्यास ते देयक स्वीकारू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र माझी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांच्या पुढाकाराने त्यांना वेतन अदा करण्याचे आदेश दिले आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक युवक आधार मुंबई/ प्रतिनिधी :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे सुयोग्य नियोजन, प्रभावी आयोजन आणि आदर्श व्यवस्थापन व्हावे या उद्देशाने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने जयंती उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा रविवार, दि. १५ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत दादर (पश्चिम), मुंबई येथील जे. एस. कोठारी बिझनेस स्कूल सभागृह, कीर्ती एम. डुंगरसी कॉलेज येथे पार पडणार आहे. सार्वजनिक उत्सव मंडळांनी डॉ. आंबेडकर जयंती उत्सव हा केवळ उत्साहात नव्हे, तर आदर्श, समाजोपयोगी आणि लोकसहभागातून साजरा करावा, यासाठी या कार्यशाळेत मार्गदर्शन व प्रबोधन केले जाणार आहे. कार्यशाळेत पुढील प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे :

* जयंती उत्सवाचे उद्दिष्ट आणि प्रयोजन • उत्सवाचे विधायक व सामाजिक स्वरूप
• उत्कृष्ट कार्यक्रम व्यवस्थापन
• विविध मंडळांबरोबर संवाद आणि समन्वय सार्वजनिक

मंडळांमधून सामाजिक व राजकीय नेतृत्वाचा उदय होतो. सार्वजनिक उत्सव मंडळे ही नेतृत्व घडविण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरू शकतात. या पार्श्वभूमीवर जयंती उत्सव अधिक संघटित, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख पद्धतीने साजरा व्हावा यासाठी ही कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे.कार्यशाळा विनामूल्य असून चहा, न्याहारी व भोजनाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात आली आहे. मात्र, पूर्वनोंदणी अनिवार्य आहे. उत्सव मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नोंदणीसाठी संपर्क : राहुल टोकेकर (९८२२९ ९७०९१) ; दिलीप नवेले (९८६७४ २४५४६) अनिल पांचाळ (९९८७५ १५५२२)

## विद्यामंदिर चा बाल महोत्सव उत्साहात संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**दिंद्रुड (माजलगाव प्रतिनिधी)**

येथील विद्यामंदिर इंग्लिश स्कूल या शाळेमध्ये वार्षिक बाल महोत्सव उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी चिमुकल्यांनी विविध घटकावर नाविन्यपूर्ण नृत्य करून प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून स्वातंत्र्य सेनानी रामराव पाटील प्रशाला चे मुख्याध्यापक परमेश्वर गायकवाड सर तर उद्घाटक म्हणून श्री संभाजी कटारे साहेब सीनियर पोलीस इन्स्पेक्टर (सी एस एम टी मुंबई) उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून कैलास आप्पा ठोंबरे, बेंद्रेसर , खापे सर, हजारे सर बारवकर सर, अजय कोमटवार, नारायण चांदबोधले, वैभव देशमाने तसेच वैद्यनाथ कन्स्ट्रक्शन चे अंगद कराड, पालक प्रतिनिधी म्हणून युवराज काशीद, पत्रकार प्रकाश काशीद नितीन वाघमोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमेच्या पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यामंदिर शाळेचे अध्यक्ष बळीराम पारेकर यांनी केले तसेच तसेच सूत्रसंचालन मोहिनी कटारे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. पवार टीचर यांनी अहवाल वाचन केला.

या वार्षिक बाल महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी विविध चित्रपट गीते, मराठी लावणी, शिवगीत, मोबाईलचा दुष्परिणाम वर आधारित अक्ट, 'अनपढ़ नेता' था यावरती नाटिका सुंदर प्रकारे सादर केली या कार्यक्रमाचे खरे आकर्षण ठरले ते रुही राजेंद्र बडे यामुलीने केलेलं अप्रतिम लावणी नृत्य यामुळे सर्व प्रेक्षक अगदी भारावून गेले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व टीचिंग आणि नॉन टिचिंग स्टाफ ने विशेष परिश्रम घेतले.शेवटी गोपाळ कटारे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# ज्ञानगंगा निवासी गुरुकुल आयोजित पालक मेळावा व गुणवंतांचा गुणगौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न




**दैनिक युवक आधार जिल्हा ग्रामीण प्रतिनिधी परभणी**

पाथरी येतील ज्ञानगंगा निवासी गुरुकुल चा प्रगतीचा आलेख दिवसेंनदिवस उंचावत आहे. मागील चार वर्षापासून पाथरी शहरांमध्ये ज्ञानगंगा निवासी गुरुकुल हे विद्यादानाचे महान कार्य करत आहे. या गुरुकुलची मुहूर्तमेढ चार वर्षाखाली रोहल्या गेली. तेंव्हा पासूनच या गुरूकुल मध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात येते. शालेय स्पर्धा परीक्षा सोबत इतर स्पर्धा परीक्षा या गुरुकुलमध्ये राबवल्या जातात. त्यातून या गुरुकुलचे आतापर्यंत 200 विद्यार्थीनि वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये आपले नाविन्यपूर्ण यश संपादन केले आहे.8वी एन एम एम एस. या परीक्षेमध्ये या गुरुकुलने पाथरी शहरात आपले एक आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. तसेच क्रीड स्पर्धेमध्ये या गुरुकुल चे विद्यार्थी विभाग आणि राज्य स्तरीपर्यंत मजल मारली आहे.त्याच विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा हा मोठ्या थाटामाटा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ६०० हून अधिक पालक उपस्थित होते.या गुणगौरव सोहळ्यासाठी ज्ञानगंगा निवासी गुरुकुल पाथरी आयोजित करण्यात आलेल्या पालकमेळावा व गुणगौरव सोहळा यामध्ये सर्व उपस्थिती पाहुणे मंडळी यांनी प्रतिमेचे पूजन करण्यात आले अध्यक्ष नितीन भैया शिंदे (मा.सरपंच देवनांद्रा ) का. उपाध्यक्ष श्री. महिपाल सर (जिल्हा परिषद देवनांद्रा) का.उद्घाटक अमोल भैया शिंदे मरडसगाव ( मा.सरपंच ) प्रमुख पाहुणे यादव सर (यादव इंग्लिश अकॅडमी) मुंजाभाऊ कोल्हे ( पाथरी शहर तालुका प्रमुख उबाटा) मनिषाताई मुंजाजी कोल्हे (पंचायत समिती सदस्य पाथरी ) सुनील पांडुरंग काळे ( मरडसगाव सरपंच ) प्रा. प्रवीण काळे (प्राध्यापक बाबळगाव ) डॉ. रोहित शिंदे, कैलास झाटे ( राजमाता अर्बन देवडी ) व सर्व उपस्थित शिक्षक पालक वर्ग महिला व विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम खूप आनंददायी आणि उत्साही वातावरणामध्ये छान पार पाडला.या कार्यक्रमाची प्रस्तावना ही सचिन रणेर सर (आर.के. कोचिंग क्लासेस)या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी पांडुरंग काळे ,आकांक्षा महादेव कदम, ऋतुजा शिवाजी काळे यांनी केलेतसेच या कार्यक्रमासाठी इतर मान्यवर उपस्थित होते त्यात संदीप टेंगसे (सरस्वती अकॅडमी),राजेश हिंगे ( गुरुमाऊली कोचिंग क्लासेस), सिद्धेश्वर सूर्यवंशी व सिद्धांत चिंचाने ( मास्टर माईंड कोचिंग क्लासेस)कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हे शारदा गणेश शिंदे मॅडम यांनी केले. गणेश गंगाधर शिंदे सर व शारदा गणेश शिंदे मॅडम (संचालक - ज्ञानगंगा निवासी गुरुकुल ) यांनी मान्यवरांचे तसेच येणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे मनापासून आभार व्यक्त केले.

# निसर्ग संवर्धनाची अनोखी धुळवड ; फ्रेंड्स ऑफ नेचर चिरनेरचा स्तुत्य उपक्रम !







**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३मार्च २०२६ रोजी फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्ग संस्था,चिरनेरच्या वतीने धुलीवंदनाचे औचित्य साधून एक आगळीवेगळी श्रमदानाची धुळवड साजरी करण्यात आली. रंगाच्या उधळणीपेक्षा निसर्गाच्या संवर्धनाला प्राधान्य देत संस्थेच्या सदस्यांनी वन्यजीवांसाठी आणि आदिवासी पाड्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या मृतप्राय झऱ्यांचे व नैसर्गिक पाण्याचे स्त्रोतांचे पुनर्जीवन करण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला. चिरनेर येथील संस्थेच्या श्री बापूजी देव देवराई प्रकल्पात वृक्षारोपण केलेल्या झाडांची मशागत, परिसराची साफसफाई आणि पेरीचे पाणी या पारंपरिक पाणवठ्या श्रमदान करून त्याचे पुनर्जीवन करण्यात आले.अनेक वर्षांपूर्वी स्थानिक आदिवासी कातकरी समाज या पाण्याच्या पिण्यासाठी वापर करत असे, मात्र काळाने वापर बंद झाल्याने हे झरे गाळाने पूर्णपणे बुजून गेले होते ,संस्थेने सातत्याने गाळ काढून या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पुन्हा सुरू केला आहे .ज्यामुळे ऐन उन्हाळयात वन्यजीवनासाठी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाली आहे. फ्रेंड्स ऑफ नेचर गेले ६ वर्षापासून सातत्याने धुलीवंदनाच्या दिवशी सुप्त अवस्थेत गेलेल्या या नैसर्गिक पाणवठ्यांना नवसंजीवनी देण्याचे काम करत आहे.

होळी नंतर वाढत्या उष्णतेमुळे आणि जंगलतोडीमुळे बाष्पीभवन वेगाने होऊन नैसर्गिक जलस्त्रोत आटतात, पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाल्यामुळे जंगलातील वन्यजीव पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येतात त्यामुळे मानव–वन्यजीव संघर्ष ,अपघात किंवा शिकारीचा धोका वाढतो. हा धोका कमी करण्यासाठी नैसर्गिक अधिवासात जलस्त्रोत उपलब्ध करणे गरजेचे आहे.

विकासाच्या नावाखाली होणारी अमर्याद वृक्ष तोड, डोंगरांचे सपाटीकरण आणि मानवनिर्मित वणवा या वाढत्या समस्या पाहता परिवर्तनाची गरज आहे. फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेने या निमित्ताने सर्वांना आवाहन केले आहे की आपल्या परंपरा प्रतीकात्मक आणि पर्यावरण पूरक पद्धतीने साजरी करून निसर्गावरील ताण कमी करूया. केवळ होळी खेळण्यापेक्षा निसर्गाशी असलेले आपले नाते घट्ट करण्यासाठी अशा निसर्ग पूरक उपक्रमात सहभागी होऊ या ,आजपर्यंत संस्थेने कडापे डोंगर ,साई डोंगर, चिरनेर पोंडा, पेरीचे पाणी (चांदायले वाडी) श्री बापूजी देव देवराई चिरनेर अशा विविध ठिकाणी पाणवठा यांचे पुनर्जीवन यशस्वीपणे केले आहे.

रंगाच्या धुळवडीपेक्षा श्रमदानाची धुळवड समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण करतआहे.

## धारणीत ह्युमन मिल्क बँक, अमरावतीत आयटी पार्कसाठी वेग

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

अमरावती, दि. 2 जिल्ह्यातील दुर्गम असणाऱ्या धारणी येथे ह्युमन मिल्क बँक आणि अमरावतीमध्ये आयटी पार्क स्थापन करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आज खासदार डॉ. अनिल बोंडे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला.यावेळी उपवनसंरक्षक अर्जुना के. आर., निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार उपस्थित होते. खासदार डॉ. बोंडे यांनी जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा केली. यात प्रामुख्याने मेळघाटातील कुपोषण निर्मूलनासाठी धारणी येथे 'ह्युमन मिल्क बँक' स्थापित करण्यात यावी. या योजनेची उपयोगिता मेळघाटात सर्वाधिक आहे. डफरीन येथील ह्युमन मिल्क बँकेचे उत्तम परिणाम मिळत आहे. त्याच धर्तीवर ह्युमन मिल्क बँक कार्यान्वित करताना तपासणी, साठवणूक, स्वच्छता घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात यावे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वन विभागाच्या जमिनीवर 'वड उद्यान' निर्माण करण्यात यावे. शहरात आयटी क्षेत्राला चालना देण्यासाठी एमआयडीसीमध्ये जागा आरक्षित करण्यात यावी. आयटी पार्कच्या विस्तारासाठी सलग जागेची आवश्यकता आहे. यासाठी संबंधितांना जागेची पाहणी करण्याबाबत कळविण्यात यावे.

मोर्शी शहरातील वाढते अतिक्रमण आणि येरला येथील 1998-99 मधील घरकुल पट्टे वाटपाचा प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात यावा. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि बँकांच्या सीएसआर निधीचा प्रभावी उपयोग करण्यात यावा. यासाठी सर्व संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी लोकप्रतिनिधी, तसेच प्रशासनासोबत समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले. सीएसआर फंडसाठी बँक, कंपन्यांनी आवश्यक सामाजिक विषय प्राधान्याने घेण्यात यावा. आरोग्य, जिल्हा परिषदेच्या शाळा, डिजिटल शिक्षण, पर्यावरण यासारख्या घटकांवर निधीचा विनियोग करणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याव्यतिरिक्त, अमरावती महानगरपालिका क्षेत्रात चिल्ड्रन्स पार्क व ग्लो गार्डन उभारण्यासाठी अंदाजे 2 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच संगीता भिसे यांच्या पाल्याला अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. धारणे येथे आदिवासी मुलांसाठी खेलो इंडियासाठी क्षेत्र विकसित करण्यासाठी जागेची पाहणी करावी. तसेच चिखलदऱ्याप्रमाणे चांगले गार्डन, चिल्ड्रन पार्क विकसित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश धारणी उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आली



# अनिष्ट प्रथांची पेटली 'होळी'

## सिल्लोडच्या शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दिला सामाजिक संदेश

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी:- योगेश पालोदकर

सिल्लोड :- शहरातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात होळीच्या सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा आणि मानवी दुर्गुणांची 'होळी' करून एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर ठेवला. लाकडांची नासाडी न करता केवळ कागदी फलकांवरील वाईट प्रवृत्तींचे दहन करून मंगळवारी (दि. ३) विद्यालयाच्या प्रांगणात हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला.

या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी हुंडाबळी, भ्रष्टाचार, स्त्री भ्रूणहत्या, तंबाखूजन्य पदार्थ, महिला अत्याचार आणि दहशतवाद अशा विविध अनिष्ट प्रथांची नावे लिहिलेले फलक एका प्रतीकात्मक होळीला लावले होते. "व्यसने सोडा, समाज जोडा" आणि "अनिष्ट प्रथांचा अंत करा" अशा घोषणा देत या सर्व फलकांचे दहन करून विद्यार्थ्यांनी समाजपरिवर्तनाचा संदेश दिला. केवळ सण साजरा करणे हा उद्देश नसून, विद्यार्थ्यांच्या मनातील वाईट विचार नष्ट व्हावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आल्याचे विद्यालयातर्फे सांगण्यात आले.



यावेळी मुख्याध्यापक कृष्णा सपाटे, पर्यवेक्षक निशांत म्हस्के, रमेश सोनवणे, ज्येष्ठ शिक्षिका संगीता तायडे, संगीता काळे, मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, रमेश परदेशी, गणेश चव्हाण, अमोल ताटू, अंगद काळे, गजानन दौड, भास्कर सागरे, अरविंद सोनवणे, पंकज सावंत, नम्रता वडमारे, हर्षदा सनांसे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने देगलूर येथे माता रमाईचे तर हणेगाव येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे**

**देगलूर :** भीमशक्ती सामाजिक संघटना शाखा देगलूरच्या वतीने फेब्रुवारी महिन्याच्या सात तारखेला माता रमाईच्या जयंती दिनाचे औचित्य साधून देगलूर येथे माता रमाईच्या जीवन चरित्रावर आधारित पुणे येथील प्रसिद्ध कलाकार प्रा.रमणी सोनवणे यांचा प्रत्यक्षदर्शी माता रमाईच्या जीवनात आलेल्या खडतर प्रवासाचा आलेला अनुभव यावेळी सादर करण्यात आला.या कार्यक्रमाला हजारो महिलांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष देगलूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष मोगलाजी सिरसेटवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शेख मीरा मोहियोदिन गटनेता नगरपालिका देगलूर धोंडीबा कांबळे देगलूर,वाय.जी. सोनकांबळे,सुजित कांबळे नगरसेवक,कार्यक्रमाचे आयोजक शत्रुघ्न वाघमारे जिल्हाध्यक्ष भीमशक्ती सामाजिक संघटना देगलूर तथा नगरसेवक नगरपालिका देगलूर व तसेच किशोर आडेकर तालुका अध्यक्ष भीमशक्ती सामाजिक संघटना देगलूर प्रकाश कदम,मारुती शेरे,भीमराव भुतनरे,सूर्यकांत सोनकांबळे,अजय सूर्यवंशी राष्ट्रपाल वाघमारे,

रेखाताई खिल्लारे,नगरसेविका स्नेहा राजाराम कांबळे,नागरबाई यादव कांबळे,जयश्री प्रकाश कदम,हनुमंत पिंगळे,रामेश्वर भाटापुरकर,सिद्धार्थ वाघमारे,चंद्रशेखर कांबळे,अजय लोणे,यांची उपस्थिती होती तर रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिनानिमित्ताने हाणेगाव येथे भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त भव्य अस रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनात जीवन चरित्रावर भव्य मार्गदर्शन व पुणे येथील प्रसिद्ध शाहीर राजेंद्र कांबळे खडूसकर यांच्या शाहिरीचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सागर देशमुख,प्रमुख पाहुणे बालाजी पोकलवार,मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर,पोलीस उपनिरीक्षक विलास पवार,संभाजी ब्रिगेडचे नांदेड जिल्हा अध्यक्ष जेजेराव पाटीलदेगलूर येथील सामाजिक कार्यकर्ते विशाल पवार,बाबूराव पाटील खुतमापूरकर,आदींची उपस्थिती होती यावेळी सर्व मान्यवरांचा भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला तर यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते बालाजी चोपडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर सखोल असे मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन




सजीवनी आटी,उमाकांत पचंगल दैनिक सकाळ पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य हणेगाव,यांनी केले कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाचे आयोजक किशोर आडेकर तालुका अध्यक्ष भिमशक्ती सामाजिक संघटना देगलूर यांनी केले तरी यावेळी प्रशांत रामपुरे,सचिन टोपे,धनाजी होटले,गणेश बरांडे,संग्राम बडगे,नितेश सूर्यवंशी,सुधाकर टोके,पत्रकार मोहसीन मुजावर,असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# अभिमानास्पद : वैशाली गोपाल भगत एमरॉल्ड डायरेक्टर लिडर पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

सन्मान स्त्रीत्वाचा... जागर नारी शक्तीचा... या उक्तीप्रमाणे नारी ही समाजाची कुशल वास्तुकार आहे आणि आपली संस्कृती स्त्रीला देवी मानणारी आहे, आपल्या महिला आज कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. यातीलच एक क्षेत्र आहे मार्केटिंग क्षेत्र या क्षेत्रातील एका महिलेने आपल्या जिद्दी आणि चिकाटीच्या जोरावर साडे तीन वर्षांत तब्बल वीस लाखांच्या वर कमाई करीत एमरॉल्ड डायरेक्टर लिडर हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार प्राप्त केला आहे. त्या आहेत वुई आर मोर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या वैशाली गोपाल भगत. यांनी अल्पावधीतच उत्तुंग भरारी घेत सर्वोत्कृष्ट एमरॉल्ड डायरेक्टर लिडर हा पुरस्कार प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्र बाहेर सुद्धा वुई आर मोर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने प्रो-विंग्स सॅनिटरी नॅपकिनच्या माध्यमातून लाखो महिलांना जोडून एक परिवार उभा केला आहे. वुई आर मोर मध्ये काम करणे म्हणजे स्वप्नपूर्ती करणे, ही कंपनी बिजनेस साठी नाहीतर एक कुटुंब एक मोठा परिवार तयार झाला आहे. वुई आर मोर या कंपनीचे सर्वेसर्वा विकास गोपाळ व डायरेक्टर प्रिया कड यांच्या मार्गदर्शनाखाली वुई आर मोर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा सहावा वर्धापनदिनाचा भव्य दिव्य सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. वैशाली गोपाल भगत या सर्वसामान्य कुटुंबातील असून देखील त्यांनी सर्वांसमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या रणरागिणी ने आयुष्याच्या या रणांगणावर स्वतःला सिद्ध केले. जगभरात कोरोना चा थैमान सुरू असताना सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य महिलांच्या सुरक्षेसाठी 3 जानेवारी 2022 रोजी वुई आर मोर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी जॉईन करून आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. विविध माध्यमातून यशस्वी वाटचाल करीत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीत भरारी घेतली आहे. विशेष वैशाली भगत यांचे अथक परिश्रम, मजबूत नेतृत्व आणि टीमसाठीच्या नि:स्वार्थ समर्पणामुळे त्यांची प्रगती होत आहे. लिडर कसा असावा हे त्यांच्या कडे पाहिले की लक्षात येते. त्यांनी केवळ स्वतः यश संपादन केले नाही, तर अनेकांना यशाचा मार्गही दाखवला आहे. त्यामुळे योग्य व्यक्तीला हा पुरस्कार मिळाला अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. विशेषता हा पुरस्कार सोहळा वाशी येथील एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुंबई कार्याध्यक्ष तथा ट्रस्टी सिद्धिविनायक मंदिर न्यास प्रभादेवी मनीषा तुपे गुरुदेव विनोद सुवर्णा, अभिनेत्री वनिता खरात, अभिनेता संतोष जुवेकर, डॉ. धनंजय पाटील, चंद्रकांत पाटील, कंपनीचे चेअरमन विकास गोपाळ, डायरेक्टर प्रिया कड, दिनेश शिंदे, संजय लाड, संदीप भालेकर, यांच्या सह सुमारे महाराष्ट्रातून पाच हजारापेक्षा जास्त महिला सदस्य उपस्थित होत्या. उपे

